मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 ❊ वर्ष २५ ❊ अंक १९९ ❊ सातारा ❊ गुरुवार, दि. २८ मार्च २०२४ ❊ पाने ६ (सुप्रभात) ❊ किंमत ५/- रूपये

भाजपाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

मुंबई (वृत्तसंस्था) : भाजपाच्या स्टार प्रचारकांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं जोरदार तयारी केली आहे. भाजपानं मध्य प्रदेश, बिहार, पश्चिम बंगालमधील स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. भाजपाच्या स्टार प्रचारकांच्या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, जेपी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, योगी आदित्यनाथ यांचा समावेश आहे.

'मविआ'ला 'वंचित'चा मोठा धक्का ! जरांगेंबरोबर युती; पहिली यादी जाहीर

राजदंड / मुंबई

मागील काही आठवड्यांपासून महाविकास आघाडीमध्ये सहभागी होण्यासंदर्भात प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीबरोबर सातत्याने बैठकींचे सत्र सुरु असतानाच बुधवारी अचानक वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्र लढण्याची घोषणा करत उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मंगळवारी रात्री प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर बैठक घेतल्यानंतर हा निर्णय घेतल्याचे जाहीर केले. पत्रकार परिषदेमध्ये यासंदर्भातील सविस्तर माहिती प्रकाश आंबेडकरांनी दिली.

जरांगे पाटलांबरोबर चर्चा झाली त्यामध्ये प्रकाश आंबेडकरांबरोबर वंचित बहुजन आघाडीच्या राज्य समितीचे सदस्य असलेले किसन चव्हाण आणि फारुख अहमदही सहभागी झाले होते. बदलाचे राजकारणाला नव्याने सुरुवात करण्याची चर्चा जरांगेंबरोबर झाली, असे आंबेडकरांनी सांगितले. ''वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कमिटीची काल बैठक झाली. या बैठकीमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. जे आमच्याबरोबर सम जोता करायला उत्सुक होते त्यांना आम्ही जरांगे-पाटील फॅक्टर लक्षात घ्यायला हवा असे आम्ही सुचवले होते. मात्र त्यांनी तो लक्षात घेतले नाही. त्यामुळेच काल मी, फारुख अहमद आणि किसन चव्हाण यांनी जरांगे पाटलांबरोबर चर्चा केली. आज उमेदवारी अर्ज भरण्याची पहिल्या फेजची तारीख आहे. त्यामुळे आज पहिली यादी जाहीर केली,'' असे प्रकाश आंबेडकरांनी सांगितले.

मनोज जरांगे पाटलांबरोबर झालेल्या चर्चेमध्ये, ''शेतकरी, बेरोजगारांचा प्रश्न, शेतीवर आधारित उद्योगांना प्राधान्य कसे द्यायचे आणि ग्रामीण भागातून उद्योजक आणि व्यवसाय कसे उभारता येतील याची चर्चा झाली. या सर्व प्रश्नांमध्ये ओबीसी समाजाचे लोकसभेत एक किंवा दोन व्यक्ती सोडल्यास गेल्या ७० वर्षात प्रतिनिधी दिलेले नाहीत. त्यामुळे या वेळेस ओबीसी, भटके-विमुक्त फॅक्टर लक्षात घेत या समाजातून उमेदवारी देऊन त्यांना जिंकून आणायचं निश्चित झाले,'' असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

जास्तीत जास्त उमेदवार गरीब समाजातील असावे आणि त्यांनाच पुढे आणण्याचा निर्णय जरांगेंबरोबरच्या बैठकीत झाल्याचे प्रकाश आंबेडकरांनी सांगितले. ''पहिल्या यादीतील उमेदवारांना जरांगे पाटलांचे समर्थन आहे. आपल्या संघटनेच्या माध्यमातून ३० तारखेला निवडणुकीत कसे सहभागी व्हावे, काय भूमिका घ्यावी यावर मतं मागितली आहेत. ३० तारखेपर्यंत कोणती घोषणा न करण्याची विनंती जरांगेंनी केली ती आम्ही मान्य केली आहे. दोघांनीही कोणत्याही उमेदवारांवर दबाव आणला जाणार नाही असं ठरवलं आहे. मात्र जे गरीब, स्वच्छ प्रतिमेचे आणि काहीतरी करण्याची जिद्द असलेल्यांनाच उमेदवारी दिली जाईल. बाकी जागांची यादी २ तारखेपर्यंत निश्चित होईल. ४ ला फॉर्म भरण्याची शेवटची संधी असल्याने २ तारखेपर्यंत नावं निश्चित केली जातील,'' असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

''भाजपाने मुस्लिमांच्या आयसोलेशनचे राजकारण सुरु केले आहे त्याला थांबवण्यासाठी या लोकसभेमध्ये मुस्लीम उमेदवारसुद्धा उतरवायचे आणि त्यांनाही उमेदवारी द्यायची. जैन समाजाचाही उमेदवार उतरवरुन त्याला जिंकून आणायचे निश्चित झाले आहे. महाराष्ट्रात उपेक्षितांची, वंचितांची आणि गरीब मराठा, मुस्लीम आणि इतर समाजाची नवीन वाटचाल आम्ही या माध्यमातून मांडत आहोत. या वाटचालीला समूह पाठिंबा देईल अशी आमची अपेक्षा आहे. राजकारण आणि निवडणूक यामध्ये प्रचंड पैसा खर्च केला जातो. गावागावातून आणि कार्यकर्त्यांकडून प्रचार सुरुवात करावा, शासनाने नेमून दिलेल्या खर्चाच्या अर्ध्या खर्चात निवडणुका पार पडतील असं आम्ही ठरवले आहे,'' असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

उमेदवारांची पहिली यादी

- भंडारा-गोंदिया - संजय गजानन केवट (दिवर समाज)
- गडचिरोली-चिमुर - हितेश पांडुरंग मडावी (गौंड समाज)
- चंद्रपूर - राजेश वारलुजी बेले (तेली समाज)
- बुलढाणा - वसंत राजाराम मगर (माळी समाज)
- अकोला - प्रकाश आंबेडकर
- अमरावती - प्राजक्ता तारकेश्वर पिल्लेवान (राखीव)
- वर्धा - प्राध्यापक राजेंद्र साळुंखे (कुणबी)
- यवतमाळ वाशिम - खेमसिंग प्रतापराव पवार (बंजारा)
- नागपूर - काँग्रेसला समर्थन
- सांगली - ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना झाली असून प्रकाश शेंडगे लढत असेल तर त्यांना पाठिंबा देणार
- रामटेक मतदारसंघाचा उमेदवार आज (२७ मार्च २०२३ रोजी) संध्याकाळी ४ वाजता घोषणा केली जाईल असं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे थेट वंशज श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचे सातारा हद्दीत आल्यानंतर जंगी स्वागत करण्यात आले. (छाया : अजित जगताप)

उदयनराजेंचे नीरा नदी तीरावर जंगी स्वागत सर्वधर्मीयांमुळे उदयनराजे गेले भारावून....

राजदंड / शिरवळ

हिंदी चित्रपटांमध्ये समतेचा नारा देणारे गीत म्हणजे 'पानी रे पानी तेरा रंग कैसा ? जिसमे मिला दो लगे उस जैसा...' याचीच सातारा जिल्ह्याच्या हद्दीतील नीरा नदीच्या तीरावर पाहण्यास मिळाले. या ठिकाणी जमलेल्या सर्व धर्माच्या कार्यकर्त्यांनी खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचे मनापासून स्वागत करून खऱ्या अर्थाने माणुसकीची रंगपंचमी साजरी केली.

सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये महायुतीची अधिकृत उमेदवारी मिळावी यासाठी खासदार उदयनराजे भोसले व त्यांचे हितचिंतक यांनी दिल्लीमध्ये यशस्वी बोलणी केल्यानंतर सातारा या आपल्या हक्काच्या होम पिचवर आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी कष्टकरी, शेतकरी तसेच सर्वपक्षीय नारा देणारे कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. भूमाता दिंडीतून सातारा जिल्ह्याच्या विकासासाठी निघालेली ही दिंडी आता विशिष्ट टप्प्यावर आलेली आहे. बुधवारी शिरवळ ते सातारा येथील शिवतीर्थवर जमलेल्या अनेक हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी वारकरी, पारंपरिक पद्धतीने वाद्य वाजविण्यात आली होती.

मावळात पोलिसांच्या नाकाबंदीवेळी सापडली ५० लाखांची रोकड

राजदंड / वडगाव मावळ

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळ तालुक्यातील पुणे मुंबई महामार्गावरील उर्से टोलनाक्यावर पोलिसांच्या नाकाबंदी दरम्यान तब्बल ५० लाखांची रोकड आढळून आल्याने खळबळ उडाली या रक्कमेत बाबत चौकशी शिरगाव पोलीस करत आहेत. अशी माहिती पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळ तालुक्यात ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे.यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघाच्या पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर नाका बंदी दरम्यान शिरगाव पोलिसांनी चारचाकी वाहनात तब्बल ५० लाख रुपयांची रोकड मिळून आली आहे. मुंबईहून पुण्याच्या दिशेने ही चार चाकी जात असताना पोलिसांनी अडवली. यात ५० लाख रुपये आढळले आहेत. एवढी मोठी रक्कम कुठे आणि कशासाठी घेऊन जात होते. याबाबतची चौकशी शिरगाव पोलीस करत आहेत. सध्या लोकसभा निवडणुका लागल्याने मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार होण्याची शक्यता आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी- चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

नितीन गडकरींनी नागपूर लोकसभेसाठी महायुतीकडून भरला उमेदवारी अर्ज

५ लाखांनी विजयी होण्याचा गडकरींना विश्वास

राजदंड / नागपूर

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे नागपूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आहेत. रामटेक लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार राजू पारवे हे आहेत. या दोघांनी आज बुधवार (दि.२७) मार्च नामांकन दाखल केलं. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते खासदार प्रफुल पटेल, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती होती. यावेळी सुरुवातीला संविधान चौकात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला नितीन गडकरी यांनी अभिवादन केलं. यावेळी, संविधान चौकात 'कहो दिल से नितीनजी फिर से', अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता. सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांमधील संघटनांनी नितीन गडकरी यांचं ठिकठिकाणी स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचण्यापूर्वी आकाशवाणी चौकात सभा झाली.

वडूज बांधकामच्या उपविभागीय अभियंत्यांची 'लाचवड' साजरी

राजदंड /वडूज

सातारा जिल्हा परिषदेच्या खटाव तालुक्यातील वडूज बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता जितेंद्र खलीपे यांना बुधवारी लाच घेतल्याप्रकरणी साताऱ्यातील लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना पैसे घेताना रंगेहाथ पकडले आणि धुळवडीच्या दुसऱ्या दिवशी त्यांची 'लाचवड' साजरी केली. त्यांच्यावर लाचलुचप्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

याबाबत माहिती अशी की, तक्रारदार यांचा अर्थमुव्हर्स व डेव्हलपर्सचा व्यवसाय असून त्यांच्या नावाने खटाव पंचायत समितीचे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या तीन रस्त्यांचे काम व एक समूह गांडूळ निर्मिती शेडचे असे एकूण चार कामाचे काम पूर्ण केल्याचा दाखला देणे करीता यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रत्येकी दोन बिलाचे दोन टक्क्यांनुसार ३४ हजार रुपयांची मागणी केली. तडजोडी अंती रूपये ५० हजार लाच रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले. उपअभियंता जितेंद्र खलीपे यांना ताब्यात घेण्यात आले असून वडूज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. खटाव तालुक्यात चांगलीच रंगू लागली आहे.

रंगाचा बेरंग झाला असला तरी यातून अनेक रंग सुटले आहेत .त्यावरही लक्ष ठेवा अशी मागणी जोर धरू लागलेली आहे. विशेष बाब म्हणजे पेडगाव ता खटाव येथील रोजगार हमी योजनेच्या कामातून तपासणी होऊन ही बिल काढण्यास विलंब लागला. त्यामुळे संबंधित ठेकेदाराला कर्ज थकल्यामुळे बँकेने लिलाव काढला जर वेळेत बिल काढले तर आर्थिक टंचाई जाणवणार नाही. असा विचार करूनच ठेकेदाराने काम केले होते. पण या रोजगार हमी योजनेच्या सुरुवातीच्या दोन टक्के रकमातूनच त्यांनी लाचलुचपत पतिबंधक विभागाचा विभागाचा आधार घेतला. आता ही रक्कम दहा टक्के एवढी वाढण्याऐवजी त्या रकमेच्या शिडीच्या काही पायऱ्या आता कमी होणार असून काम तपासून घेतले तरी बिल देण्यास विलंब लागला याचा आता शोध घेणे गरजेचे झालेले आहे.

वास्तविक पाहता लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन होत असतानाच खटाव तालुक्यातील वडूज बांधकाम विभागात लाच घेणे म्हणजे आचारसंहितेचाच एक भाग आहे की काय ? असं समजून वरिष्ठ अधिकारी लाच घेत असतील तर निवडणुकीच्या अनुषंगाने आणखीन काय काय घडत असेल. याची आता खमंगदार चर्चा सुरू झालेली आहे.

वास्तविक पाहता बांधकाम विभाग आणि मार्च एंडिंग आणि टक्केवारी अशी महायुती म्हणा किंवा महाविकास आघाडी म्हणा सर्वत्र सुरू आहे. आता अनेक अधिकारी सावध झाले असले तरी ज्या ठेकेदारांचे उकळ पांढरे केलेले आहेत अशा ठेकेदारांना आता आपलं दुःख मांडता येत नाही तर ज्याचं जळतं त्यालाच कळतं अशा पद्धतीने आता तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीची पाठराखे सुद्धा उभे राहिलेले लागलेले आहे.

लाचलुचपतचे पो.नि. सचिन अंकुश राऊत, पो. नि. विक्रम शिवाजी पवार, पो. हवा. गणेश ताटे, पो.ना. निलेश चव्हाण, स.पो.उप. निरीक्षक शंकर सावंत, पो.हवा. नितीन गोगावले, म.पो.ना. प्रियांका जाधव, पो.कॉ. विक्रमसिंह कणसे, पो.ना मारूती अडागळे, मार्गदर्शक अधिकारी राजेश वसंत वाघमारे, पोलीस उपअधीक्षक यांच्या टीमने ही कामगिरी केल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

रामराजे नाईक निंबाळकर यांच्या नाराजीवर आमची चर्चा सुरू

सर्वजण एकत्र बसून सकारात्मक निर्णय घेऊ - अजित पवार

राजदंड / पुणे

महायुतीचे जागावाटप २८ तारखेला होणार आहे. परंतु, माढ्यामध्ये धैर्यशील मोहिते भाजपामध्ये नाराज आहेत. तर, राष्ट्रवादीत रामराजे निंबाळकर नाराज आहेत. ही अंतर्गत नाराजीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमची याबद्दल चर्चा सुरू आहे. सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न आम्ही सगळे एकत्र बसून करत आहोत अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे. पुण्यात आज महायुतीच्या उमेदवारासाठी पैलवानांचा आणि क्रीडा क्षेत्रातील लोकांचा मेळावा भरवण्यात आला होता. त्याला अजित पवार यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना वरिल गोष्टी सांगितल्या.

अजित पवार म्हणाले, २८ तारखेला

महाराष्ट्रातील महायुतीच्या ४८ जागांचं चित्र स्पष्ट होईल. मग त्यात सातारा असेल, नाशिक असेल, माढा हे सगळी मतदारसंघ असतील. असंही अजित पवार म्हणाले. तसंच, प्रकाश आंबेडकर यांनी वेगळा मार्ग निवडला आहे यावर बोलताना, ते वंचित आघाडीचे प्रमुख नेते आहेत. त्यांची निश्चितपणे आज महाराष्ट्रामध्ये ताकद आहे. आपण मागच्या वेळी पाहिले त्यांनी उमेदवार उभे केल्यानंतर त्यावेळेसचे महाविकास आघाडीचे अनेक उमेदवार पराभूत झाले. सुशील कुमार शिंदे, अशोक चव्हाण, राजेश विटेकर अशी अनेक नावं आपल्याला सांगता येतील असंही अजित पवार म्हणाले आहेत.

मत विभागणी होणार : वंचितला लाखांच्या पुढे मतदान झालं आणि त्यातून आघाडीच्या उमेदवाराला पराभवाचा फटका बसला. प्रकाश आंबेडकरांची महाविकास आघाडी सोबत बोलणी सुरू होती. त्यांच्या प्रेस कॉन्फरन्सही आम्ही बघत होतो. परंतु, शेवटी ज्याने त्याने काय निर्णय घ्यायचा हा संविधानाने दिलेला त्यांचा अधिकार आहे, असंही अजित पवार म्हणाले आहेत. वंचित आणि मनोज जरांगे हे एकत्र येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मत विभागणी होईल का? यावर अजित पवार म्हणाले जास्त उमेदवार उभे केल्यानंतर मत विभागणी होते. त्याचा फटका कुणालातरी बसतोच असंही ते म्हणाले आहेत.

महिंद्रा झायलोवर धडकली नॅनो कार, ९ जखमी

राजदंड / पोलादपूर

बुधवारी दुपारी साडेचार वाजण्याच्यादरम्यान म हाड तालुक्यातील लग्न उरकून दापोलीतील गावाकडे जाणाऱ्या टाटा नॅनो कारला पोलादपूर तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर लोहारमाळनजिक भीषण अपघात झाला. या अपघातात टाटा नॅनो कारमधील नऊ प्रवासी जखमी झाले असून दोन लहान मुलांचाही जखमींमध्ये समावेश आहे. या जखमींपैकी दोन गंभीर दुखापत झालेल्यांना पुढील उपचारासाठी डेरवण येथे पाठविण्यात आले आहे. सर्व ९ जखमी प्रवासी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील शिवनारी सुतारवाडी येथील रहिवासी आहेत.

महाड तालुक्यातील बारसगाव तळीये येथे टाटा नॅनो कारने लग्न समारंभासाठी गेलेले कुटूंबिय लग्न समारंभ उरकून दापोलीकडे परताना नॅनो चालक सुमित विष्णू कासेकर (वय ३२, शिवनारी,सुतारवाडी, ता. दापोली) हा आपल्या ताब्यातील नॅनो कार (क्रमांक एमएच ०६ बीई ७६०५) घेऊन दापोली दिशेने जात असताना लोहारमाळ गावाच्या हद्दीत आला असता हॉटेल कदम पॅलेससमोर रस्त्याच्या कडेला उभी असणारी झायलो कार (क्रमांक एम एच ०४इडी ००६४) वर भरधाव वेगाने आदळून अपघात झाला.

सुशीलकुमार शिंदे यांनी कमावलेल्या मालमत्तेचा हिशेब द्यावा!

आमदार राम सातपुते यांचे आव्हान

राजदंड / सोलापूर

सोलापूर लोकसभा राखीव मतदारसंघात काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे आणि भाजपचे आमदार राम सातपुते यांच्यातील थेट लढतीला सुरूवातीपासून रंग चढत आहे. दोन्ही बाजूंनी दारूगोळा तयार असून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. आमदार सातपुते यांनी, आपल्या मालमत्तेचा हिशेब तयार असून सोलापुरातून अनेक वर्षे सत्ताकारणात प्रतिनिधित्व केलेले ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी कमावलेल्या मालमत्तेचा हिशेब द्यावा, असे आव्हान दिले आहे.

सोलापुरात माजी मुख्यमंत्र्यांची कन्या विरुद्ध ऊसतोड मजुराचा मुलगा, अशीच लढाई होणार असल्याचा पुनरूच्चारही भाजपचे उमेदवार सातपुते यांनी केला. आमदार सातपुते हे उपरे असून बीड जिल्ह्यातील आष्टीचे राहणारे आहेत. मागील २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत माळशिरस राखीव मतदारसंघाशी कसलाही संबंध नसताना भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांना गळ घालून राम सातपुते यांना निवडून आणण्यास सांगितले होते. त्यानुसार सातपुते यांना निवडून दिले गेले. त्यावेळी सातपुते यांचे आई-वडील ऊसतोड मजूर असून झोपडीत राहतात. त्यांनी माळशिरसमध्ये साखर कारखान्यांसाठी ऊसतोड केली होती, असा दावा करून सातपुते यांचा माळशिरसचा संबंध जोडण्यात आला होता. दरम्यान, आमदार झाल्यानंतर सातपुते यांनी टोलेजंग बंगला बांधला. स्वतःचा विवाह सोहळा धूमधडाक्यात श्रीमंतीच्या थाटात केला होता, असे मुद्दे त्यांच्या झोपडी आणि बंगल्याच्या छायाचित्रांसह आता लोकसभा निवडणुकीत समाज माध्यमांतून उपस्थित केले जात आहेत. त्याकडे लक्ष वेधले असता आमदार सातपुते यांनी सुशीलकुमार शिंदे यांच्या मालमत्तेचा मुद्दा मांडला.

प्रतापसिंहनगरात अतिक्रमणांसह लल्लन आणि युवराजच्या दहशतीवर जिल्हा प्रशासनाचा 'बुलडोझर'

- अतिक्रमणधारकांना देण्यात आल्या होत्या नोटीसा
- २६ मार्चपर्यंत महसूल विभागाने दिली होती मुदत

राजदंड / सातारा

खेड ग्रामपंचायत हद्दीतील मुलकी पड असलेल्या शासकीय जमीनीवर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या तब्बल १५ कुटुंबांनी विना परवाना रहिवासी आणि वाणिज्य कारणास्तव मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले होते. दि.२६ मार्च पर्यंत ते अतिक्रमण तत्काळ काढून घेण्याबाबत महसूल विभागाकडून नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. आदेशाचा अल्टिमेटिम संपल्यानंतर काल रात्री तात्काळ मोहीम ठरली गेली. त्यानुसार एकूण १६ घरांवर बुलडोझर फिरवण्याची कारवाई करण्यात येत आहे.

आतापर्यंत ६ घरांवर बुलडोजर फिरवला आहे, तर दत्ता जाधवचे घर पाडण्याचे काम सुरू आहे. पुढे युवराज जाधवचे टोलेजंग बांधकामही पाडण्यात येणार आहे. प्रशासनाने मोठे बंदोबस्त ठेवले असून कोणालाही याठिकाणी प्रवेश बंदी करण्यात आली आहे. पहाटे साडेपाच पासून ही कारवाई अत्यंत गुप्तता पाळून करण्यात येत आहे.

तहसिलदार नागेश गायकवाड यांनी काढलेल्या नोटीसा मंडल अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांनी समक्ष देऊनही प्रतापसिंह नगरातील गुन्हेगारी कुटुंबांनी अतिक्रमण काढून घेतले नाही. त्यामुळे महसूल विभागामार्फत आज सकाळी पाच वाजल्यापासून बुलडोझर लावून हे अतिक्रमण काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

खेड ग्रामपंचायत हद्दीतील २५९ गुंठे मुलकी पड क्षेत्रात काही कुटुंबांना १० बाय १० एवढीच जागा रहिवासी कारणास्तव दिली गेली होती. येथील गट नंबर ७० मधील खेड ग्रामपंचायत हद्दीतील मुलकी पड शासकीय जमीनीवर अनेकांनी रहिवासी आणि वाणिज्य कारणास्तव मोठ्या प्रमाणावर कच्ची, पक्की बांधकामे केली आहेत. यात ग्रामपंचायतीने काही अटीशर्तीवर दिलेल्या या जागेत प्रत्येकाने सोईस्कर विनापरवाना बांधकामे केली आहेत. यात सातत्याने गुन्हेगारी कारवाया करत मारहाण, लुटालूट, गंभीर गुन्हे करणार्यांच्या कुटुंबांनी तर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करत शासकीय जमीन बळकावली आहे. तसा गटविकास अधिकारी यांचा अहवाल, तर मंडल अधिकारी, तलाठी यांच्या स्थळ पाहणी अहवालानंतर या कुटुंबांना अतिक्रमण काढून घेण्याचे महसूल विभागाने फर्मान काढले होते. यावरूनच मोठ्या प्रमाणात ही कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ५० अधिनियमाचे उल्लंघन केलेल्या तब्बल १६ गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबांना दि.२१ मार्च रोजी तहसिलदारांनी काढलेल्या नोटीसा मंडल अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांनी प्रत्येकाला देऊन केलेले अतिक्रमण दि. २६ मार्च पर्यंत काढून घेण्याचा इशारा दिला होता. तरीदेखील स्थानिकांकडून कडून स्वतःहून अतिक्रमणे काढण्यात आली नाहीत.

नोटीसा मिळाल्यावर एकानेही अतिक्रमण काढून घेतले नाही. त्यामुळे शासकीय यंत्रणेमार्फत हे अतिक्रमण काढण्याची मोहीम आज पहाटेपासूनच उघडण्यात आली आहे. यासाठी होणारा खर्च संबंधित कुटुंबाकडून वसूल केला जाणार आहे. यावेळी काही आपत्कालीन परिस्थिती, नुकसान झाले तर या सर्व कुटुंबांना सर्वस्वी जबाबदार धरणार असल्याचा इशारा तहसिलदार नागेश गायकवाड यांनी नोटीसीद्वारे दिला होता. त्यामुळे घटनास्थळावर कोणीही अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न देखील केला नाही. शेकडोच्या संख्येने पोलीस फौजफाटा व पोलीस अधीक्षक सातारा समीर शेख व महसूल विभाग, नगरपालिका चे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने या ठिकाणी फौजफाटा घेवून आज पहाटेपासूनच याठिकाणी उपस्थित आहेत.त्यामुळे गुन्हेगारांचा बिमोड करण्यासाठी उत्तर प्रदेश पॅटर्न सारखा प्रतापसिंह नगरातील अतिक्रमण काढण्यासाठी बुलडोझर कारवाई करण्यात येत आहे. महसूल विभाग सकाळपासूनच ऍक्शन मोडमध्ये आला आहे. या कारवाईमुळे खेड, कृष्णानगर, संगमनगर सह सातारकरांनी नगरपालिका, पोलीस प्रशासन, जिल्हाधिकारी यांचे अभिनंदन करीत आभार मानले आहेत.

स्मितसेवा फाउंडेशची अनाथाश्रमातील विद्यार्थ्यांसोबत रंगांची उधळण

राजदंड / हडपसर

होळी सण धुलीवंदन निमित्त स्मितसेवा फाउंडेशन आयोजित 'रंगबंध उत्सव' हा कार्यक्रम हडपसर गाडीतळ येथील घरटे प्रकल्प या मुलींच्या अनाथ आश्रम मध्ये भाजपा ओबीसी मोर्चा पुणे शहर सरचिटणीस व स्मितसेवा फाउंडेशच्या संस्थापक अध्यक्षा स्मिताताई तुषार गायकवाड यांच्या वतीने अनाथाश्रमातील विद्यार्थ्यांसोबत रंगाची उधळण करीत उत्सव साजरा केला.

अनाथाश्रमातील विद्यार्थ्यांना खाऊ व स्टेशनरी साहित्य वाटप केले. यावेळी स्मितसेवा फौंडेशनचे सदस्य व मैत्रिणींनी सहभाग घेतला.

या उत्सवास ज्ञान प्रबोधिनी शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिताताई वाघ, भाजपा पुणे शहर महिला आघाडी उपाध्यक्षा सीमाताई शेंडे, भाजपा पुणे शहर ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष पल्लवीताई केदारी, भाजप हडपसर विधानसभा ओबीसी मोर्चा अध्यक्षा संजना कोद्रे, मणीकर्णिका ग्रुपच्या मनीषा राऊत, मेनका उमडेकर, श्रीदेवी काणिकर, संगीता पाटील, अलका शिंदे, सुनीता पाटील, विमल वागलगावे, अंजली शहा, उर्मिला प्रभुणे, छाया दांगट, उषा ठाकरे, वैशाली पाटील, आरती कांबळे, निकिता निंगाले, मीना पिंटो, ग्रेटा इरेकस्वामी, भावना कांबळे, गायत्री बेडगांवकर, लता सोनवणे, सोनाली ओव्हाळ, मंगल नवसुपे, सोनल जैन, प्रेरणा बचूटे, शालू भाटिया, रसिका गलांडे, सुनीता गोळे, शीला भास्करकट्टी, मेघना ननावरे, वैष्णवी पवार, गोविंद कांगणे, संतोष भाटिया, आनंद जंगम, उत्तम आण्णा बांदल, काशिनाथ भुजबळ, सचिन इचके, सोमनाथ साळुंके यांच्यासह स्मितसेवा फौंडेशन सदस्य उपस्थित होते.

हिंदू धर्म प्रतिगामी नाही : उदयनाथ महाराज

'नाद अनाहत' मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन

राजदंड / पुणे

व्यापक परंपरा लाभलेला हिंदू धर्म अनादी काळापासून विश्वकल्याण आणि शांतीचा संदेश देत आहे. हिंदू मुळातच सहिष्णू असून काळानुरूप अनेक बदल या धर्माने स्वीकारले आहे. त्यामुळे हिंदू धर्म प्रतिगामी कधीच नव्हता आणि नाही असे मत 'शिव कैलास' असवली येथील महायोग आश्रमाचे सर्वेसर्वा ब्रह्मचैतन्य उदयनाथ महाराज यांनी येथे व्यक्त केले.

उद्गार भारत भारततर्फे काल 'नाद अनाहत' मासिकाचा प्रकाशन सोहळा उदयनाथ महाराज यांच्या अध्यक्षतेखाली गणेश हॉल, न्यू इंग्लिश स्कूल येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी क्षेत्र सिद्ध जोगेश्वरी बन येथील महंत शिवगिरी महाराज, सोमनाथ महाराज, वाणिज्य विषयक अभ्यासक डॉ. अनिल कुलकर्णी, प्रकाशनच्या संस्थापिका आसावरी पाटणकर, संपादक सुजीत भोगले, मार्गदर्शक शशांक महाजन यांच्या हस्ते 'नाद अनाहत' मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले.

यावेळी कुलकर्णी म्हणाले की, धार्मिक ध्रुवीकरणाने भारताचे विभाजन झाले. त्या आधी अनेक परकीय आक्रमणे हिंदू धर्मावर झाली. स्वातंत्र्यानंतरही अनेक वर्षे हिंदूंना कायम दुय्यम, कमी लेखले गेले. राजकीय वर्चस्वाच्या छुप्या हेतूने काहींनी एकत्र येऊन हिंदू म्हणजे प्रतिगामी, बुरसटलेले, अंधश्रद्धा मानणारे असा समज पसरवण्यास सुरुवात केली. प्रसंगी इतिहासातही छेडछाड करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. दुर्दैवाने, काही अंशी त्यांचा हेतू साध्य करण्यात त्यांना यशही आले. अशा डाव्या विचारसरणीचा आणि स्वतः ला सो कोल्ड पुरोगामी म्हणून घेणाऱ्या पूर्वग्रहदूषित विचारांचा पगडा इतका वाढला की, सनातन धर्माच्या प्रचार-प्रसार करणारे वक्ते, साहित्यिक यांना व्यासपीठ मिळणेही बंद झाले. प्रसारमाध्यमातूनही याच विचारसरणीचा प्रभाव वाढू लागला.

ते पुढे म्हणाले की, गेल्या १० वर्षात खऱ्या अर्थाने हिंदुत्ववादी विचारांना बळ मिळायला सुरुवात झाली. आज धार्मिक ध्रुवीकरण करण्याची कुवत डाव्या विचारसरणीत नसली तरी जाती जातीत फूट पाडून लोकांची मने दुभंगून टाकण्याचा कुटील डाव काही अपप्रवृत्तींकडून रचला जात आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण हिंदू धर्माला वाहिलेले मासिक सुरू करण्याचे धाडसी पाऊल आसावरी पाटणकर आणि सुजित भोगले यांनी उचलले आहे. यातून सनातन धर्म, इतिहास, संस्कृती, कला याची सर्वांगीण माहिती पुरविणारे दर्जेदार लेख रसिक वाचकांना उपलब्ध होतील, अशी मला खात्री आहे असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

यंत्र, तंत्र, मंत्र याच्या संयोगाने पुढे जाणारे हे युग असून हिंदू धर्माने हे सूत्र स्वीकारले पाहिजे. हिंदू धर्माने कायमच जनकल्याणाचा संदेश दिला आहे. विदेशी राष्ट्रांमध्ये आपल्या धर्माचे आकर्षण वाढत असताना आपल्या राष्ट्रात मात्र हिंदू धर्माविषयी द्वेष पसरवला जाणे ही दुर्दैवी बाब आहे. अशा परिस्थितीत उद्गार भारतने 'नाद अनाहत'ची सुरुवात करून शिवधनुष्य हाती घेतला आहे. यात त्यांना यश येऊ दे. संयमी आणि उत्कृष्ट लेखातून समाजाला प्रकाशाकडे नेणारे हे मासिक ठरू दे. हा अंक देशभर नव्हे तर जगभर प्रसिद्ध होऊ दे. अशा शब्दात महंत शिवगिरी महाराज यांनी मासिकाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

नाद अनाहत मासिकाच्या प्रकाशनप्रसंगी (डावीकडून) आसावरी पाटणकर, महंत सोमनाथगिरी महाराज, महंत शिवगिरी महाराज, उदयनाथ महाराज, अनिल कुलकर्णी, शशांक महाजन, सुजीत भोगले.

मराठीतील धर्मयुग म्हणजे 'नाद अनाहत '

कला, संस्कृती आणि इतिहास या विषयांना वाहिलेले 'धर्मयुग' हे साप्ताहिक अत्यंत लोकप्रिय होते. हे साप्ताहिक बंद पडल्यानंतर या विषयांना वाहून घेतलेले एकही साप्ताहिक, पाक्षिक किंवा मासिक छापले जात नव्हते. 'नाद अनाहत' हे मासिक धर्म, कला, संस्कृती, इतिहास आणि अध्यात्म या विषयांनाच समर्पित असेल. या मासिकातून दर्जेदार साहित्य प्रकाशित करण्याचा आमचा प्रयत्न असून 'नाद अनाहत' रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास आसावरी पाटणकर, सुजीत भोगले यांनी व्यक्त केला आहे.

'ईशरे' पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी आशुतोष जोशी; २ एप्रिलला शपथग्रहण सोहळा

राजदंड / पुणे

इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग इंजिनीअर्स (ईशरे), पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी आशुतोष जोशी यांची २०२४-२५ या वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. आशुतोष जोशी आणि त्यांच्या केंद्रीय कार्यकारिणीचा (सीडब्ल्यूसी) शपथग्रहण सोहळा दि.२ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता नोव्होटेल, विमाननगर, पुणे येथे होणार आहे.ईशरे, पुणे शाखेचे मावळते अध्यक्ष नंदकिशोर कोतकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

नवनिर्वाचित कार्यकारिणीमध्ये या क्षेत्रातील मान्यवर व्यावसायिकांचा समावेश आहे. चेतन ठाकूर, सुभाष खनाडे, अमित गुलवाडे, नंदकिशोर कोतकर, सुजल शाह, विमल चावडा, रितेश खेरा, विशाल पवार, प्रमोद वाजे, नीलेश गायकवाड, अरुण चिंचोरे, नीरज मग्रानी, कौस्तुभ वाणी, डॉ. शिकलगार नियाज दिलावर, सुबोध मुरकेवार, मानस कुलकर्णी, डॉ.अंशुल गुजराथी, रशिदा शब्बीर, शशिधर, सिंपल जैन, महेश मोरे, उल्हास वतपाळ, देविका मुथा, हर्षदा राणे, प्रमोद सीजी(जैन), दिलीप झा, तुळशीदास चौधरी यांचा समावेश या कार्यकारिणीमध्ये आहे.

'ईशरे', पुणे चॅप्टरचा हा ३२ वा शपथग्रहण सोहळा आहे. २ एप्रिल १९९३ मध्ये पुणे चॅप्टर ची स्थापना झाली. हीटिंग, रेफ्रिजरेशन, व्हेंटिलेशन, एअर कंडिशनिंग या क्षेत्रातील अभियंते, व्यावसायिकांना मार्गदर्शन करून विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे काम ही संस्था करते.

मोटरमनच्या प्रसंगावधानामुळे वाचला प्रवाशाचा जीव

राजदंड / मुंबई

मोटरमनच्या प्रसंगसावधानामुळे एका प्रवाशाचा जीव वाचवण्यात यश आले आहे. होळीच्याच दिवशी चर्चगेट-वांद्रे लोकलच्या मोटरमनला एक भयानक अनुभव आला. मात्र, त्यांच्या प्रसंगावधानामुळे एका व्यक्तीचा जीव थोडक्यात वाचला आहे.

मुंबई लोकलमधून प्रवास करणाऱ्या लोकांची संख्या खूप जास्त आहे. एक प्रकार रविवारी होळीच्या दिवशी घडला होता. वांद्रे येथे चर्चगेट-विरार फास्ट लोकलच्या खाली एका अज्ञात व्यक्तीने आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, मोटरमनच्या प्रयत्नाने या व्यक्तीचा जीव वाचला आहे.

लोकसभा निवडणूक : सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार एकाच मंचावर येणार

राजदंड / पुणे

लोकसभा निवडणूक जाहीर झाली आहे. महाराष्ट्रात पाच टप्प्यांमध्ये निवडणूक पार पडणार आहे. महाराष्ट्रातल्या बारामतीत काय होणार? याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याचं सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे अशी होणारी लढत. महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे बारामतीत लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. तर महायुतीकडून सुनेत्रा पवार रिंगणात असतील. नणंद विरुद्ध भावजय असा हा सामना असणार आहे. अशात आज सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार एकाच व्यासपीठावर येणार आहेत.

बारामतीच्या लढतीकडे सगळ्यांचं लक्ष

खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात त्यांच्या वहिनी सुनेत्रा पवार लोकसभा लढणार आहेत. या नावाची घोषणा अद्याप झालेली नाही. गुरुवारी म्हणजेच २८ मार्चला या नावाची घोषणा होण्याची शक्यता आहे. लोकसभेच्या रिंगणात आमने-सामने उभ्या ठाकणार असल्याच्या चर्चा रंगल्यानंतर पहिल्यांदाच विद्यमान खासदार सुप्रिया सुळे आणि त्यांची वहिनी सुनेत्रा पवार एकत्र एकाच मंचावर दिसणार आहेत.

एकाच मंचावर येणार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार

बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संभाव्य उमेदवार सुनेत्रा पवार आगामी लोकसभा एकमेकांच्या विरोधात लढवणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. राजकीय वर्तुळात नणंद-भावजयीत रंगणाऱ्या या निवडणुकीच्या चुरशीची जोरदार चर्चा रंगली आहे. अशातच आता पुन्हा राजकीय वर्तुळात या नणंद-भावजयची चर्चा रंगली आहे. याचं कारण म्हणजे, लवकरच सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार एका मंचावर एकत्र दिसणार आहेत. बारामती तालुक्यातील डोर्लेवाडी येथे संत तुकाराम महाराज बीज यानिमित्ताने एकत्र येण्याची शक्यता आहे.

बारामती तालुक्यातील डोर्लेवाडी येथे तुकाराम बीज साजरी केली जाते. गेली अनेक वर्ष सुप्रिया सुळे तुकाराम बीजेच्या निमित्तानं कार्यक्रमाला हजेरी लावतात. यावर्षी सुनेत्रा पवार देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळते आहे.

पुणे लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची नियोजन बैठक

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज काँग्रेस भवन येथे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुणे लोकसभा निवडणुकीच्या नियोजना संदर्भात आज दु. १२.०० वा., शहर काँग्रेसचे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली व त्यानंतर दु. १.०० वा., महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांसोबत बैठक पार पडली.

या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या नियोजना संदर्भात महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी विधानसभा निहाय निवडणुक कचेरी टाकणे, शहर व विधानसभा निहाय समन्वय समिती तयार करणे, दि. २९ मार्च रोजी सायं. ५.०० वा., इंडिया फ्रंट आघाडीतील घटक पक्षांसोबत बैठकीचे आयोजन, पत्रकामध्ये कोणकोणत्या मुद्दांचा समावेश असावा, महाविकास आघाडीचे विधानसभा निहाय निरिक्षक नेमणे तसेच निवडुकीच्या दृष्टीने विविध कमिट्या तयार करणे या विषयांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत महाविकास आघाडी व मित्र पक्षाचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांना भरघोस मतांनी निवडून आणण्याचा निर्धार करण्यात आला.

या बैठकीस पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे, महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर, माजी आमदार मोहन जोशी, रमेश बागवे, ॲड.अभय छाजेड, कमल व्यवहारे, दिप्ती चवधरी, संजय बालगुडे, दत्ता बहिरट, अजित दरेकर, अमीर शेख, त्याचबरोबर शिवसेनेचे (उध्दव बाळासाहेब ठाकरे गट) विभाग प्रमुख गजानन थरकुडे, संजय मोरे, कल्पना थोरवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष प्रशांत जगताप, अंकुश काकडे, रविंद्र माळवदकर आदींसह महाविकास आघाडीचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

'देवगिरीचे यादव उर्फ जाधव' हा ऐतिहासिक दस्तऐवज

ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांचे प्रतिपादन

राजदंड / सातारा

देवगिरीचे यादव उर्फ जाधव'' हा ऐतिहासिक दस्तऐवज अर्थशास्त्राचे प्राध्यापक व इतिहास संशोधक प्रा अर्जुन जाधव यांनी आपल्या हातात सोपवला आहे अशा प्रकारचे गौरवोद्गार प्राच्यविद्या पंडित ज्येष्ठ विचारवंत डॉ आ.ह. साळुंखे यांनी सातारा येथे बोलताना काढले.

सातारा येथे अनौपचारीक कार्यक्रमांमध्ये लोकायत प्रकाश यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेला प्रा.अर्जुन जाधव लिखित देवगिरीचे यादव उर्फ जाधव हा संशोधनात्मक ग्रंथ प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आला. त्यावेळी साळुंखे बोलत होते.

प्रा. अर्जुन जाधव हे अखंडपणे संशोधन करत आहेत. देवगिरीचे यादव उर्फ जाधव हा संशोधनात्मक ग्रंथ उपयुक्त ठरेल असेही प्रा डॉ.आ.ह. साळुंखे यांनी सांगितले

सूत्रसंचालन रामदास निकम यांनी केले. प्रास्ताविक व या संशोधनात ग्रंथाची माहिती लेखक प्रा अर्जुन जाधव यांनी दिली.

यावेळी प्रा. अविनाश लेवे देशमुख, ज्येष्ठ पत्रकार विजय मांडके, इंजिनीयर तुकाराम मचे (अहमदनगर), ॲडव्होकेट वृषाली दांडेकर (दापोली), सागर जाधव, भानुदासराव कदम (धाराशिव) उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ यांनी घेतली संजयनाना काकडे यांची भेट

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभेचे माजी खासदार संजयनाना काकडे यांची त्यांच्या निवासस्थानी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भेट घेतली. यावेळी संजयनानांनी उमेदवारीबद्दल अभिनंदन करत स्वागतपर सन्मान केला. प्रचार नियोजनासह विविध विषयांवर दोघांमध्ये संवाद झाला.

पुणे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची इच्छा काकडे यांनी व्यक्त केली होती. त्या पार्श्वभूमीवर मोहोळ आणि काकडे यांची भेट महत्वपूर्ण मानली जात आहे. काकडे यांना मानणारा मोठा नगरसेवकांचा गट पुणे भाजपमध्ये आहे. जवळपास ३० नगरसेवक आहेत.

२०१७ च्या पुणे महापालिका निवडणुकीत भाजपचे ९८ नगरसेवक निवडणून येणार असल्याचे काकडे यांनी जाहीर केले होते. त्यानंतर तेवढेच नगरसेवक निवडून आल्याने सर्वांनाच धक्का बसला होता. काकडे हे निवडणुकीचा अंदाज व्यक्त करणारे म्हणून ओळख आहे. भाजपतर्फे उमेदवारी जाहीर झाल्यानंतर मोहोळ यांनी गाठीभेटी घेण्यावर भर दिला आहे. यापूर्वी त्यांनी इच्छुक असलेल्या माजी आमदार जगदीश मुळीक यांचीही भेट घेतली होती.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या 'होळीची पोळी करू दान' उपक्रमाला रहिमतपुरात मोठा प्रतिसाद

राजदंड / कोरेगाव

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रहिमतपूर यांच्या वतीने होळी सणा निमित्त होळी लहान करा, पोळी दान करा उपक्रमाला रहिमपुरात मोठा प्रतिसाद. गेली बारा वर्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रहिमतपूर हा उपक्रम राबवत आहे.या उपक्रम अंतर्गत होळीमध्ये जी पोळी नैवेद्य म्हणून टाकली जाते त्याची जळून नासाडी होते, त्यापेक्षा ही पोळी आपण एकत्र करून गोरगरिबांना वाटण्यात आल्याची माहिती माजी प्राचार्य नाना राऊत यांनी दिली.

''होळीची पोळी करू दान'' हा उपक्रम दरवर्षी अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही ग्रामीण भागामध्ये राबवत असते. यावर्षीही रहिमतपूर येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला. होळी मध्ये पुरण पोळीचा नैवेद्य न टाकता तो अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र गोळा केला आणि गरीब लोकांच्यात वाटप केला. या उपक्रमाला मोठा उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.

महाराष्ट्रामध्ये सरासरी २५ ते ३० टक्के लोक रोज उपाशी झोपलेले असतात ,यासाठी किमान होळी सणा निमित्त होळीत नैवेद्य अर्पण न करता पोळी दान केली तर आपण त्यांच्या एक दिवसाची भूक जरी भागवली शकतो असा या उपक्रमाचा हा मुख्य हेतू आहे.

या उपक्रमाची तयारी करत असताना गावातील महिला वर्ग आणि बालचमु नी ही भरपूर सहकार्य केले. महिला वर्गाकडून या उपक्रमाला छान पसंती व प्रतिसाद मिळाला. महिलांनी आपले मत स्पष्ट करताना अंनिस जे हे काम करत आहे त्याचे कौतुक करत आभार मानले.

अंनीसचे खंदे कार्यकर्ते माजी प्राचार्य नाना राऊत यांनी ही मुलांना- महिलांना भारतीय संस्कृतीत साजरे होणारे परंपरागत सण, उत्सव साजरे होत असताना त्याला सध्य चुकीच्या पद्धतीने करती आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या सन निमित्त हा उपक्रम का राबवते याचे स्पष्टिकरण केले. मोहसिन शेख यांनीही महिला वर्ग मुलांना या उपक्रमाचे महत्त्व आणि पर्यावरण पूरक होळी कशी व का साजरी करावी याचे मार्गदर्शन केले. जवळपास १४०० च्या आसपास पोळ्या जमा झाल्या होत्या. सर्व पोळ्या गोळा करून ऊस तोड कामगार, तसेच कोलाटे वस्ती या ठिकाणी वाटप करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी रहिमतपूर मधील नाना राऊत सर, भगवान माने सर,नागेश राऊत सर, विपुल साळुंखे ,पिंटू चव्हाण, गणेश माने,जाकिर आतार तसेच रहिमतपूर मअंनिस शाखेचे उपाध्यक्ष अमित शिंदे, राज्य कार्यकारणी सदस्य शंकर कणसे, शिवाजी शिंदे, प्रवीण माने मोहसिन शेख यांनी मदत केली. आजच्या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे आपले मधूकर माने सर यांचे नातू अरव माने आणि नात नायरा माने या दोन्ही बाल कार्यकर्त्यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शेवटपर्यंत साथ दिली.

रामदास आठवलेंसाठी शिर्डी लोकसभेची जागा सोडा!

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ब्राह्मण आघाडीची मागणी

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन रामदास आठवले यांना शिर्डी लोकसभेची जागा सोडलीच पाहिजे, अशी आग्रही मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ब्राह्मण आघाडीतर्फे करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ब्राह्मण आघाडीतर्फे आज

बारामती लोकसभा मतदार संघाच्या वस्ताद आणि पैलवान यांचे साठी आयोजित मेळाव्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा छगन भुजबळ यांची भेट घेऊन रामदास आठवले यांचे साठी शिर्डी लोकसभा मतदार संघाची जागा सोडावी, या बाबत सर्व कार्यकर्त्यांच्या भावना तीव्र आहेत. उद्या या बाबत राज्य कार्यकारिणी बैठक आयोजित केलेली आहे, तरी तुम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्य मंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेऊन जागा सोडावी.

सन्मान जनक भूमिका लवकर जाहीर करावी अशी आग्रही मागणी करण्यात आली.

याबाबत मी तर सकारात्मक आहे आणि उद्या आमची या बाबत बैठक आहे त्यात तुमची मागणी मी नक्की मांडून पाठपुरावा करेन असे आश्वासन दिले.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस चे शहर अध्यक्ष दीपक मानकर, रिपब्लिकन एम्प्लॉइज फेडरेशन चे PMPML युनिट अध्यक्ष नागेश गायकवाड, रिपब्लिकन ब्राह्मण आघाडीचे प्रमोद दिवाकर, अनिरुद्ध जोशी, मुकुल देशपांडे, प्रसाद आठवले, किरण मजुमदार आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते, अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ब्राह्मण आघाडीचे अध्यक्ष ॲड. मंदारभाऊ जोशी यांनी दिली.

सदाशिव पेठेतील खोदाई लेखी परवानगीसह चलन भरूनच

महावितरणकडून स्पष्टीकरण

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

सदाशिव पेठमधील दोन वितरण रोहित्रांच्या वीजपुरवठ्यासाठी नवीन भूमिगत वीजवाहिनी टाकण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडून सर्वप्रथम चलन भरून लेखी परवानगी घेण्यात आली होती. यासंदर्भात नकाशा देखील सादर करण्यात आला होता असे स्पष्टीकरण महावितरणकडून देण्यात आले आहे.

सदाशिव पेठ येथील दोन वितरण रोहित्रांचा व पर्यायाने प्रामुख्याने घरगुती व वाणिज्यिक अशा २७४ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. पाहणीमध्ये ११ केव्ही भूमिगत वीजवाहिनीमध्ये बिघाड झाल्याने वीज खंडित झाल्याचे दिसून आले. या दोन रोहित्रांना इतर वाहिनीद्वारे पर्यायी स्वरूपात वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र, उन्हाळ्यामुळे वीज भार वाढत असल्याने नादुरुस्त वीजवाहिनी बदलणे आवश्यक झाले. त्यासाठी नादुरुस्त भूमिगत ११ केव्ही वाहिनीच्या जागी नवीन वाहिनी टाकण्यासाठी महानगरपालिकेकडे ९० रनिंग मीटर रस्ता खोदाईची परवानगी मागण्यात आली होती.

खोदाईसाठी दि. ११ मार्चला महावितरणकडून खोदाई शुल्काचे ५ लाख ४८ हजार ६४० रुपये (चलन क्र. १६१७०) जमा करण्यात आले. त्यानुसार पथ विभागाने दि. १३ मार्च रोजी लेखी परवानगी दिली व त्यात दि. १५ मार्च ते ३१ मार्चच्या कालावधीत संबंधित ठिकाणी खोदाई करून नवीन वीजवाहिनीचे काम पूर्ण करावे असे नमूद केले आहे. .

महावितरणकडून दि. २२ मार्च रोजी वाहतूक कमी झाल्यानंतर सायंकाळी खोदाईसह नवीन वीजवाहिनी टाकण्याचे कामास सुरवात करण्यात आली. मात्र ५० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर पालिकेच्या सूचनेनुसार ते सध्या थांबविण्यात आले आहे. त्यामुळे प्रथम चलन भरून व त्यानंतर लेखी परवानगी घेऊनच संबंधित ठिकाणी खोदाई केल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आमदारांवर झालेली टीका सर्वपक्षीय कृती समितीच्या अध्यक्षांना का झोंबली...?

औंधसह २० गावांच्या संघर्ष समितीच्या नावावर आमदारांनी काहीही खपवू नये - सरपंच दिनकर शिंगाडे

राजदंड / वडूज

औंधसह २० वंचित गावांच्या पाणी प्रश्नासंदर्भात पाणी संघर्ष समिती च्या वतीने आयोजित पाणी पे चर्चा कार्यक्रमात आ. जयकुमार गोरेंनी पाण्याचं राजकारण करू नका असं सर्वांना आवाहन केलं. माजी आयुक्त प्रभाकर देशमुख ही जनतेच्या भल्यासाठी सहकार्य म्हणून एक पाऊल पुढे आले, आणि काही गोष्टीत लोकप्रतिनिधी कडून चुका झालेत. तरी यापुढे आम्ही सहकार्य करू असं एका पत्रकार परिषदेत सांगितलं. त्यात नेमकं असं काय घडलं की आमदारांवर झालेली टीका सर्वपक्षीय कृती समितीच्या अध्यक्षांना का झोंबली...?औंधसह २० गावांच्या संघर्ष समितीच्या नावावर आमदारांनी काहीही खपवू नये असा इशारा खरशिंगे सरपंच दिनकर शिंगाडे यांनी पाणी संघर्ष समितीला एका पत्रकाद्वारे दिला.

दरम्यान, प्रभाकर देशमुख यांनी औंधसह २० गावांच्या पाणी प्रश्नाबाबत घेतलेल्या भूमिकेचे औंधसह वंचित २० गावांच्या कृती समितीने स्वागत केले आहे. केवळ नावालाच असलेले अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या हाताला धरून आमदार गोरे यांना हा प्रश्न आपल्या सोयींनी पुढे नेता येणार नाही. आम्हाला तुमच्या राजकारणाशी काहीही देणेघेणे नाही. आम्ही खुल्या मनाने तुमचे ऐकून घेतले आता प्रभाकर देशमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून काही जास्त माहिती देणार असतील तर पाणी योजनेच्या भल्यासाठी आम्ही तुमच्याप्रमाने त्यांचीही मदत घेऊ अशी भूमिका कृती समितीने घेण्याऐवजी टीका करून काय साध्य केलं,अशी भूमिका ज्ञानेश्वर शिंदे यांनी मांडली आहे. उरमोडी मध्ये कुणी काय केले.. जिहे कटापुर मध्ये काय झाले.. याचे तुणतुणे कुणीही या ठिकाणी वाजवू नये.आमचा सगळा फोकस औंध सह २० गावाच्या योजनेवर आहे.खटाव तालुका पाणी संघर्ष पाणी समितीने सुद्धा आम्हाला काही सूचना करत पाठिंबा दिला. आम्ही त्यांचे सुद्धा खुल्या मनाने आभारी आहे.औंध कृती समिती

म्हणजे संतोष मांडवे आणि धनाजी आमले मेजर नव्हेत तर हा लढा सर्व गावचे प्रतिनिधी एकत्र येऊन लढत आहेत. समितीमध्ये सचिवासह उरलेले २० सदस्य आहेत.. याचे भान अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी ठेवावे...लगेच कुणाच्या आहारी जाऊ नये...गेली १५ वर्षे आमदार तुम्ही आहे. मात्र तरीपण लवादाच कारण सांगून पाणी देन्याची जबाबदारी तुम्ही झटकत होता म्हणून आम्ही जबाबदारी दाखवण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आमदार जयकुमार गोरे यांनी केवळ शब्द दिला आहे. आणि तो देताना खुल्या पणाने पाणी पे चर्चा घडवून आणली.मात्र राना भिमदेवीच्या थाटात पाणी प्रत्यक्षात दिला असल्याचा आविर्भाव सुरू झाला आहे.हे योग्य नाही.परवाच्या जाहीर चर्चेत आमदार गोरे म्हणाले विरोधकांनो राजकारण करू नका.. मग आता तुम्ही कशाला राजकारण करताय? प्रभाकर देशमुख खुल्या मनाने या योजनेसाठी राजकारणापलीकडे जावून मदत करू असे म्हणले. या भागाला लवकरात लवकर पाणी मिळाले पाहिजे ही भूमिका धनाजी आमले यांना का पटली नाही किंवा यात त्यांना कोणी हाताला धरून राजकारण दाखवले हा अभ्यासाचा विषय आहे. काही दिवसांपासून सर्वपक्षीय पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या भूमिका संशयास्पद आहेत. पाणी पे चर्चा हा कार्यक्रम कुठेतरी आमदारांची डागाळलेली प्रतिमा पुसण्यासाठी घेतला होता का असा संशय लोकांच्या मनात होताच, परंतु आता आमदार जयकुमार गोरे यांच्यावर केलेल्या टीकेला धनाजी आमले यांनी उत्तर देवून त्या गोष्टीला दुजोराच दिला आहे.

२०१९ ला तुम्ही पहिल्यांदा प्रस्ताव दिला असे म्हणताय मग त्या पूर्वी २००९ पासून ते २०१९ पर्यंत १० वर्षे तुम्हाला या भागातील लोकांच्या वेदना दिसल्या नाहीत का? मतदारसंघात होत असलेल्या चांगल्या कामांचे श्रेय जर आमदारांना घ्यायचे असेल तर जी मतदारसंघातील गावे पाण्यापासून किंवा विविध सोई सुविधांपासून वंचित आहेत त्याचे अपयश देखील मान्य करावे लागेल. धनाजी आमले यांना देशमुख साहेब आयुक्त होते त्यांनी का केलं नाही हे विचारण्याचा अधिकार तुम्हाला नाही तुम्ही तुमची पातळी ओळखून टीका करावी. तुमच्या आंदोलनाला कोणताही श्रेयवाद न करता पाठिंबा देणारे देशमुख साहेबांना तुम्ही बदनाम करताय आणि तुमचे आंदोलन कोणाच्यातरी सांगण्यावरून चालू आहे असे खोटे आरोप करणाऱ्या आमदारांची तुम्ही बाजू घेताय हे तुम्हाला न शोभणारे आहे.

आम्हाला या भागातील जनता महत्वाची आहे. असे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे.. तर आमदार गँगचा जळफळाट का होत आहे?या प्रकरणात औंध कृती समितीने काही भूमिका घ्यायच्या आधीच आमदार समर्थकांच्या प्रभाकर देशमुख यांच्या विरोधात पोस्ट फिरायला लागल्या.आम्ही यापूर्वी सांगितले आहे.. आम्ही अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना तुम्हाला बोलावण्याची मोठ्या मनाने परवानगी दिली म्हणजे या योजनेबद्दल कुणी काहीही बोलले तर लगेच तुम्ही अथवा तुमच्या समर्थकांच्या पोस्ट फिरवणे आम्हाला योग्य वाटत नाही. तुमची ही भूमिका अतिशय चुकीची असून सर्वपक्षीय कृती समितीची लोकांच्या मनातील विश्वासार्हता कमी करणारी आहे. तुमच्या या भूमिकेशी कृती समिती मधील सदस्य सहमत नसल्याचं ही दिनकर शिंगाडे यांनी म्हटलं आहे.

जानकर यांची अल्पसंतुष्टता

राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक - अध्यक्ष , माजी मंत्री महादेव जानकर यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्या गळाला लागण्यापासून रोखण्यात उपुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यश आले आहे.

पवार यांनी जानकर यांना लोकसभेसाठी माढाची जागा सोडण्याचे निश्चित केले होते. पण जानकर यांनी आता फडणवीस यांनी दिलेली परभणीची जागा स्वीकारून भाजपसोबत राहणेच पसंत केले आहे. त्यांना पवार यांच्याहून फडणवीस यांनी अधिक काही दिले अशातला भाग नाही. जानकर यांची अपेक्षा, मागणी एका जागेपेक्षा अधिक नव्हतीच. ती भाजपकडूनच पूर्ण झाली आहे. आपल्या समाजाची हक्काची व्होट बँक राज्यभरात गाठीशी असतानाही बहुजन चळवळीतील नेते समाजाला सत्तेत योग्य तो वाटा मिळवून देण्याऐवजी स्वत:पूरती एखादी जागा मिळवण्यात धन्यता मानतात, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. जानकर यांना भाजपने दिलेली परभणीची जागा पडती आहे की, त्यांच्यासाठी लोकसभेचे दार खुले करणारी आहे, याचा निकाल आता लागायचा आहे.

महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षानंतर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा रिपाइं हा भाजपचा आणखी एक मित्र पक्ष होय. या लोकसभा निवडणुकीत शिर्डी आणि सोलापूर या दोन जागांची मागणी रिपाइंने केली आहे. आठवले यांच्या राज्यसभेतील खासदारकीचा कार्यकाल दोन वर्षे म्हणजे एप्रिल २०२६ पर्यन्त शिल्लक आहे. पण ते शिर्डी येथून लोकसभेत जावू इच्छित आहेत. तर, रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या रूपाने सोलापूरसाठी प्रबळ उमेदवार आठवले यांच्याकडे आहे. त्या दोन्ही जागा रिपाइं हा पक्ष गंभीरपणे आणि सर्वशक्तीनिशी लढवेल, यात शंका घ्यायला वाव नाही. तरीही राज्यसभेतील आपल्या शिल्लक कार्यकालाचा विचार करता आठवले हे कदाचित शिर्डीऐवजी सोलापूरच्या एका जागेसाठी भाजपकडे आपली सारी ताकद पणाला लावू शकतात. ते पक्षाची प्रतिष्ठा राखणारे ठरेल.

मात्र भाजपने सोलापूर येथून काँग्रेस - महविकास आघाडीच्या प्रणिती शिंदे यांच्या विरोधात माळशिरसचे आमदार राम सातपुते यांना तिकीट दिले आहे. ते मूळचे मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील आहेत. त्यांचे सोलापूरच्या निवडणूक रिंगणात स्वागत करतानाच एका अनावृत्त पत्राद्वारे त्यांचे ' उपरेपण ' प्रणिती शिंदे यांनी खुबीने अधोरेखित केले आहे.

राम सातपुते यांची लोकसभेसाठीची उमेदवारी ही रिपाइंला खिजवणारी आणि नामुष्कीकारक ठरली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत भाजपने दोन जागा रिपाइंला दिल्याचे सांगत आपल्या ' कमळ ' चिन्हावर त्यांचेच जे दोन उमेदवार निवडून आणले, त्यातले सातपुते हे एक आहेत. आमदार झाल्यावर त्यांनी रिपाइंशी कधीही कोणताच संबंध - संपर्क ठेवला नाही. ही गोष्ट खुद्द रामदास आठवले यांचे सहायक सचिव आणि सामाजिक कार्यकर्ते प्रवीण मोरे यांनी सोशल मीडियावर ' खुलेआम ' सांगितली आहे. त्या पार्श्वभूमीवर, राम सातपुते यांची सोलापुरातील उमेदवारी ही बौद्ध समाज आणि आंबेडकरवादी कार्यकर्ते यांना दुखावणारी ठरली आहे. त्यावरून रिपाइं कार्यकर्त्यांच्या भावना तर अतिशय तीव्रपणे व्यक्त होताना दिसतात.

शिर्डी आणि सोलापूर या दोन जागांची मागणी भाजपने धुडकावून लावली तर पुढे काय, यावर उद्या गुरुवारी २८ मार्च रोजी रिपाइंची निर्णायक बैठक पुण्यात होत आहे. केंद्रातील

राज्यमंत्री पदामुळे राजकीय भूमिका घेतांना काही मर्यादा पडत असल्या तरी त्यांच्या पक्षाची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे, हे आठवले यांना यावेळी विसरून चालणार नाही एवढे निश्चित. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत राज्यभरात रिपाइं कार्यकर्त्यांची भूमिका काय राहणार यावर भाजपचा बराचसा निकाल अवलंबून आहे.

- दिवाकर शेजवळ
divakarshejwal1gmail.com

कर्नाटकातील साईभक्तांसाठी सांगली रेल्वे स्थानकाचा सेतू, राणी चेन्नम्मा एक्स्प्रेसचा फायदा

सांगली : कर्नाटकात लाखो साईभक्त वर्षभरात महाराष्ट्रातील शिर्डी देवस्थानला जात असतात. या सर्व साईभक्तांसाठी आतासांगलीरेल्वेस्थानक सेतूचे काम करणार आहे. राणी चेन्नम्मा एक्स्प्रेस व महाराष्ट्र एक्स्प्रेसच्या वेळा त्यांच्यासाठी सोयीच्या होणार असून यातून सांगलीतील अनेक ऐतिहासिक मंदिरांना भेट देणेकर्नाटकातीलभाविकांना शक्य होणार आहे.-ऊतएठढखडएचएछढपश्चिम महाराष्ट्ररेल्वेप्रवासी ग्रुपने याबाबत कर्नाटकातील भाविकांना सोशल मिडियावर आवाहन केले आहे. कर्नाटकातील भाविकांना थेट शिर्डीला जाण्यासाठी गाडी नाही. त्यामुळे खासगी किंवा महामंडळाच्या बसने त्यांना प्रवास करावा लागतो. गाड्या बदलाव्या लागताहेत. मात्र, आता सांगली रेल्वे स्थानकावरुन सुरु झालेल्या राणी चेन्नम्मा एक्स्प्रेसमुळे कर्नाटकातील भाविकांची गैरसोय दूर होणार आहे. याशिवाय सांगली शहराजवळ असलेल्या अनेक मंदिरांना भाविक भेटी देणार असल्याने त्याठिकाणचे पर्यटनही वाढणारा आहे. सांगली रेल्वे स्थानकावरील या एक्स्प्रेसमुळे बेंगलोर, हुबळी, धारवाड,

दावणगिरी, बेळगाव येथील भाविनांची सोय होईल.असा करता येणार प्रवास

प्रवासी संघटनेने दिलेल्या माहितीनुसार राणी चेन्नम्मा एक्स्प्रेस दररोज रात्री ११ वाजता बेंगलोरमधून सुटते. त्या गाडीतून कर्नाटकातील संबंधित मार्गावरील साईभक्तांनी सांगली स्थानकापर्यंत यावे. ही गाडी दुपारी साडे बारा वाजता सांगलीत पोहचते. सांगलीतील काही मंदिरांना भेट देऊन सायंकाळी ४ वाजता महाराष्ट्र एक्सप्रेसने त्यांना थेट कोपरगावपर्यंत जाता येते. परतीच्या प्रवासातही महाराष्ट्र एक्स्प्रेसने सांगलीपर्यंत सकाळी १० वाजता येता येते. याठिकाणी आणखी काही देवस्थानांना भेटी देऊन दुपारी ३ वाजता राणी चेन्नम्मा एक्सप्रेस पकडून गावी परतता येते.या ठिकाणांना भेट देणे शक्य

सांगलीतील गणपती मंदिर, हरीपूर येथील बागेतील गणपती मंदिर, हरीपूरचे संगमेश्वर मंदिर, संगम, औदुंबर येथील दत्त मंदिर, दंडोबा अभयारण्य, काशिलिंग देवस्थान आदी ठिकाणी कर्नाटकातील भाविकांना भेट देता येऊ शकते, असे प्रवासी संघटनांनी सुचविले आहे.

जोतिबा चैत्र यात्रेत मद्यपान केल्यास कारवाई करणार, शाहूवाडी उपविभागीय पोलीस अधीक्षकांचे आदेश

जोतिबा : चैत्र यात्रेत मद्यपान करून सहभागी होणाऱ्या भविकांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश शाहूवाडी उपविभागीय पोलीस अधीक्षक अप्पासाहेब पवार यांनी दिले. जोतिबा चैत्र यात्रेच्या पार्श्वभूमीवर जोतिबा डोंगर येथे सासनकाठीधारक भाविकांची शाहूवाडी उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन बैठक झाली.

श्री क्षेत्र जोतिबा डोंगर येथील श्री जोतिबाची चैत्र पौर्णिमेची यात्रा २३ एप्रिलला होत आहे. या पार्श्वभूमीवर आज जोतिबा डोंगर येथे जिल्हा प्रशासनाच्यावतीने सासनकाठीधारकांची नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मानाच्या सासनकाठ्या असणाऱ्या भाविकांना यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सूचना देण्यात आल्या. ज्यावेळी मानाच्या सासनकाठ्यांची मिरवणूक सुरू असते त्यावेळी बिगर मानाच्या सासनकाठ्यांचा त्या मिरवणुकीत समावेश न करता त्यांना वेगळी वेळ द्यावी जेणेकरून मुख्य मिरवणुकीत गर्दी होणार नाही, अशी काही भाविकांकडून मागणी करण्यात आली. या सूचनेवर विचार करून निर्णय देण्याचे आश्वासन शिंगटे यांनी दिले.

मानाच्या सासनकाठ्याना ओळखपत्र देणे, सासनकाठीधारकांना पार्किंग व्यवस्था, सासनकाठीची उंची मर्यादित ठेवणे, सासनकाठ्यांचा क्रम ठरवून देणे यावर चर्चा करण्यात आली. या बैठकीला पन्हाळ्याच्या तहसीलदार माधवी शिंदे, गटविकास अधिकारी सोनाली माडकर, कोडोली पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास कोडग, वाहतूक पोलिस निरीक्षक नंदकुमार मोरे, जोतिबा मंदिराचे व्यवस्थापक धैर्यशील तिवले, पोलिस उपनिरीक्षक मनोज कदम, मंडल अधिकारी वासंती पाटील, तलाठी रमेश वळिवडेकर उपस्थित होते.

अखेर शरद पवारांचा भाजपला मोठा धक्का

भाजपने माढा लोकसभा मतदारसंघात खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केली. यामुळे अकलूजचे मोहित पाटील नाराज असल्याची चर्चा सुरू होती. दरम्यान, आता एक मोठी बातमी समोर आली आहे. धैर्यशील मोहिते पाटील 'राष्ट्रवादी शरदचंद्र पवार' पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती जयसिंह मोहिते पाटील यांनी दिली आहे. यामुळे आता पश्चिम महाराष्ट्रात भाजपला हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे. उद्या अकलूजचे विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील यांच्यासह धैर्यशील मोहिते पाटील खासदारशरद पवारयांची मुंबई भेट घेणार असून उद्याच पक्ष प्रवेश करणार असल्याचे बोलले जात आहे.-

१००० कोटींचा घोटाळा, संजय राऊतांची कन्या वाईन कंपनीची डायरेक्टरगेल्या काही

दिवसापासूनमाढालोकसभा मतदारसंघाची जोरदार चर्चा सुरू आहे. भाजपने राज्यातील पहिल्याच यादीत खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केली, या मतदारसंघात धैर्यशील मोहिते पाटील यांनीही उमेदवारीची मागणी केली होती. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या उमेदवारीला शिवसेना शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांनीही विरोध केला होता, तर काही दिवसापूर्वी अकलूज येथे मोहिते पाटील यांच्या निवासस्थानी राष्ट्रवादी अजित पवार यांच्या गटातील नेते रामराजे नाईक निंबाळकर, शेकापचे जयंत पाटील यांनी बैठक घेतली होती. या बैठकीनंतर मोहित पाटील वेगळा निर्णय घेणार असल्याचे बोलले जात होते. दरम्यान, आज जयसिंह मोहिते पाटील यांनी याबाबत माहिती दिली आहे.'आम्हीशरद पवारांच्यापक्षात प्रवेश करणार'मी धैर्यशील मोहिते पाटील यांना उमेदवारी द्यावी असं चार महिन्यापूर्वीच म्हटले होतं. आमदार रणजितसिंह मोहिते पाटील भाजपमध्येच राहणार आहेत. आम्ही काल त्यांना सांगितलं की, तुम्ही तुमच्या पक्षात रहा. आता आम्ही सर्वांनी शरद पवार यांच्या पक्षात जायचं ठरवलं आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून आम्ही जनमत घेतलं, असंही जयसिंह मोहिते पाटील म्हणाले.

'जनसुविधां'चे १३.५० कोटी मिळाले

पण आचारसंहितेत थांबली कामे !

अकोला : जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेत जिल्ह्यातील 'जनसुविधां'च्या विविध विकासकामांसाठी जिल्हा परिषदेला १३ कोटी ५० लाख ४८ हजार रुपयांचा निधी मिळाला असला तरी, उपलब्ध निधीतून प्रस्तावित १५८ विकासकामांचे कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) अद्याप बाकी आहेत. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने नवीन कामे सुरू करता येणार नसल्याने, जिल्ह्यातील 'जनसुविधां'ची कामे थांबल्याचे वास्तव आहे. जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेत २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील लहान व मोठ्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रातील विविध जनसुविधांच्या कामांसह तीर्थक्षेत्र व यात्रास्थळांच्या विकासकामांसाठी मंजूर १३ कोटी ५० लाख ४८ हजार रुपयांचा निधी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तीन टप्प्यांत २६ मार्चपर्यंत जिल्हा परिषदेला प्राप्त झाला.

..अशी आहेत प्रस्तावित विकासकामे !

'जनसुविधा'अंतर्गत जिल्ह्यात लहान व मोठ्या ग्रामपंचायती अंतर्गत रस्ते, ग्रामपंचायत भवन, स्मशानभूमी सुविधा, पेव्हर ब्लॉक, पथदिवे तसेच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी रस्ते, पिण्याचे पाणी, पेव्हर ब्लॉक आदी विविध विकासकामे प्रस्तावित आहेत.

पंचायत समित्यांना निधी वितरणाची प्रक्रिया सुरू !

जनसुविधांतर्गत जिल्ह्यातील प्रस्तावित विविध विकासकामांसाठी प्राप्त निधी जिल्ह्यातील सातही पंचायत समित्यांना वितरित करण्याची प्रक्रिया २६ मार्चपासून सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या सूत्रांनी दिली.

परंतु उपलब्ध निधीतून जिल्ह्यातील प्रस्तावित १५८ विकासकामांचे कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया अद्याप बाकी आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता १६ मार्चपासून लागू करण्यात आली असून, आचारसंहिता कालावधीत नवीन विकासकामांच्या 'वर्क ऑर्डर' काढता येणार नसून, नवीन कामे सुरू करता येणार नाहीत. त्यामुळे निधी उपलब्ध असला तरी, आचारसंहितेत जिल्ह्यातील 'जनसुविधां'ची कामे अडकल्याचे चित्र आहे.

जिल्ह्यातील लहान ग्रामपंचायतींतर्गत मंजूर ९८ विकासकामांसाठी ८ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी आणि मोठ्या ग्रामपंचायती अंतर्गत २ विकासकामांसाठी २६ लाख ५८ हजार रुपयांचा निधी प्राप्त आहे. जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र व यात्रास्थळांच्या ५८ विकासकामांसाठी ४ कोटी ७८ लाख ९० हजार रुपयांचा निधी प्राप्त आहे.

२३ संवेदनशील मतदान केंद्रांसाठी पंचसूत्री!

जळगाव : गतकाळात निवडणुक प्रक्रियेत 'ब्लॅक स्पॉट' ठरलेल्या मतदान केंद्रांना सुरक्षा पुरविण्यासाठी 'पंचसूत्री' हाती घेतली जाणार आहे. पोलीस आणि महसुल प्रशासनाच्या माध्यमातून गुन्हेगारी प्रवृत्तीला आवर घालत 'पंचसूत्री'च्या माध्यमातून सुरक्षा कवच निर्माण केले जाणार आहे. त्यादृष्टीने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी या संहितेनुसार उपाययोजना पूर्ण करण्यासाठी दि.१५ एप्रिलपर्यंत डेडलाईन दिली आहे.

'नॉन फोर्स सिव्हिल मेझर्स' या संकल्पनेतून ही 'पंचसूत्री' हाती घेतली जाणार आहे. या प्रक्रियेत पोलीस स्टेशननिहाय अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी, प्रांताधिकारी, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा समावेश असणार आहे. या प्रक्रियेतून मतदानाची टक्केवारी वाढ, तक्रार आणि आरोपमुक्त प्रक्रिया, दीर्घकालिन शांतता टिकविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

कार्यक्षेत्राचा नकाशा उपलब्ध करुन गतकाळात अप्रिय घटना घडलेल्या ठिकाणांवर चिन्हांकित केले जाईल. या परिसरातील हिंसक जमावाकडून वापरल्या जाणाऱ्या मार्गाला चिन्हांकित केले जाईल. प्रथम माहिती अहवाल आणि आरोपपत्रावरून, आरोपी गुन्हेगारांची ओळख पटवून त्यांच्या घरांवर 'वॉच' ठेवला जाणार आहे.

प्रतिबंधात्मक कारवाईआरोपी प्रवृत्तीविरोधातबॉण्ड घेण्याचा प्रस्ताव सादर करा, निवडणुक काळात क्षेत्राबाहेर जाण्यासाठी त्याला प्रवृत्त करा. तसेच आवश्यकतेनुसार एमपीडीएचा प्रस्ताव सादर करा.

भौतिक पायाभूत सुविधामतदान केंद्रापर्यंत मतदारांची मुक्त संचार सुनिश्चित करण्यासाठी

उपाययोजना तत्काळ हाती घ्याव्यात. मतदानाच्या दिवसासाठी, शेवटच्या ४८ तासांसाठी किंवा संपूर्ण प्रचार कालावधीसाठी उपलब्ध मनुष्यबळानुसार बंदोबस्ताची आखणी करावी.

सार्वजनिक सहभागशांतता समितीच्या बैठका, सक्तीच्या उपाययोजना करू, शस्त्रे जप्तीसह महिला, दुर्बल घटक आणि ज्येष्ठ मतदारांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा.

रॅली आणि रोड शोसाठी हिंसाचाराचे संभाव्य ठिकाण टाळावे. नियंत्रणासाठी तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांची उपस्थिती अनिवार्य आहे. सहाय्यकनिवडणूकअधिकारी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नियोजनाच्या देखरेखीसाठी भेट देतील.मतदारांची ओळखीसह त्यांची पडताळणीसाठी 'अलर्ट' राहावे.

दहिगाव (चोपडा), चोपडा-७० आणि ८६, अट्रावल (रावेर) २४५ आणि २४७, भुसावळ ११६, जळगाव शहर एमआयडीसी ३०७, ३५५, २६, पाळधी २४९, धरणगाव (जळगाव ग्रामीण) २१७, अमळनेर १५२ आणि १९१, एरंडोल ५०, रवंजे (एरंडोल) ७१, भडगाव १०९, वडगाव (पाचोरा) २९२, सावदा १६, ऐनपूर (मुक्ताईनगर) ५२

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

कर्णधाराच्या एका चुकीमुळे मुंबईची धुलाई; समालोचकांनीही समजावलं गणित

हैदराबाद:मुंबई इंडियन्सचासंघ नेहमी युवा खेळाडूंना संधी देत आला आहे. आयपीएलच्या सतराव्या हंगामातील आपल्या दुसऱ्या सामन्यात मुंबईने १७ वर्षीय गोलंदाजाला संधी दिली. १९ वर्षाखालील विश्वचषकात चमक दाखवणाऱ्याक्वेना मफाकाला हैदराबादविरूद्धच्या सामन्यात संधी मिळाली. पण, या युवा खेळाडूची चांगलीच धुलाई झाली. मुंबईचा कर्णधारहार्दिक पांड्यानेमहाकाला पहिले षटक टाकायला दिले. मात्रपहिल्याच षटकापासून ट्रॅव्हिस हेडने स्फोटक खेळी करायला सुरूवात केली.-ऊतएठढखडएचएछढसनरायझर्स हैदराबादआणिमुंबई इंडियन्सयांच्यात हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सामना होत आहे.हार्दिक पांड्यानेनाणेफेक जिंकून यजमानांना प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने सुरुवातीपासूनच स्फोटक खेळी केली.ट्रॅव्हिस हेडने अवघ्या १८ चेंडूत ५० धावा करून ऐतिहासिक खेळी केली. मयंक अग्रवाल स्वस्तात परतल्यानंतर ट्रॅव्हिस हेडने स्फोटक खेळी करून मुंबईची डोकेदुखी वाढवली. त्याने २४ चेंडूत ६२ धावा कुटल्या. हेडच्या खेळीत ३ षटकार आणि ९ चौकारांचा समावेश राहिला. घातक वाटणाऱ्या हेडला बाद करण्यात गेराल्ड कोएत्झीला यश आले.ड्ठक चे वादळहेडला अभिषेक शर्माने चांगली साथ अन् दिली अन् काही मिनिटांतच हेडचा विक्रम मोडला. अभिषेक हैदराबादकडून सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा खेळाडू ठरला. त्याने अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक झळकावण्याची किमया साधली. अभिषेक शर्माने ७ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने २३ चेंडूत ६३ धावांची स्फोटक खेळी केली. आयपीएलच्या इतिहासात पहिल्या १० षटकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम देखील या सामन्यात झाला.सनरायझर्स हैदराबादने१० षटकांत २ बाद १४८ धावा करून मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. लक्षणीय बाब म्हणजे जसप्रीत बुमराहसारखा स्टार गोलंदाज असताना त्याला पहिले षटक न दिल्याने समालोचकांनी देखील प्रश्न उपस्थित केले. सलामीच्या सामन्यात देखील याचा प्रत्यय आला होता. आजही हार्दिकने युवा खेळाडूकडे नवीन चेंडू सोपवला. बुमराहला चौथे षटक टाकण्याची संधी दिली. खरं तर हैदराबादने पहिल्या ७ षटकांतच १०० धावांचा आकडा गाठला आणि १० षटकांत २ बाद १४८ धावा कुटल्या. बुमराह वगळता मुंबईच्या सर्वच गोलंदाजांची धुलाई झाली. तत्पुर्वी, मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दोन्हीही संघांनी प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल केला. यजमान संघात ट्रॅव्हिस हेड आणि जयदेव उनाडकट यांची एन्ट्री झाली आहे. तर मुंबईच्या संघात ल्यूक वुडच्या जागी घुशपर चरहिरज़र ला संधी मिळाली आहे

.आजच्या सामन्यासाठी हैदराबादचा संघ -

पॅट कमिन्स (कर्णधार), मयंक अग्रवाल, राहुल त्रिपाठी, एडन मार्करम, हेनरिक क्लासेन (यष्टीरक्षक), अब्दुल समद, शाहबाज अहमद, ट्रॅव्हिस हेड, भुवनेश्वर कुमार, मयंक मार्कंडेय आणि जयदेव उनाडकट.आजच्या सामन्यासाठी मुंबईचा संघ -

हार्दिक पांड्या (कर्णधार), रोहित शर्मा, इशान किशन, तिलक वर्मा, टीम डेव्हिड, नमन धीर, गेराल्ड कोएत्झी, जसप्रीत बुमराह, पियुष चावला, शम्स मुलाणी, क्वेना महाका.

१६ चेंडूत ५० धावा! अभिषेक शर्मा सुस्साट



हैदराबाद : यजमानसनरायझर्स हैदराबादकडूनट्रॅव्हिसहेडने धुलाई केल्यानंतर अभिषेक शर्माने देखील हात साफ केले. मुंबईचा कर्णधारहार्दिक पांड्यानेयुवा गोलंदाजाला पहिले षटक टाकण्याची संधी दिली. खरं तर आज मुंबईने १७ वर्षीय गोलंदाजाला मैदानात उतरवले. पण त्याची चांगलीच धुलाई झाली.१९ वर्षाखालील विश्वचषकात चमक दाखवणाऱ्याक्वेना महाकाला हैदराबादविरूद्धच्या सामन्यात संधी मिळाली. परंतु, या युवा खेळाडूची चांगलीच धुलाई झाली. मुंबईचा कर्णधारहार्दिक पांड्यानेमफाकाला पहिले षटक टाकायला दिले.-ऊतएठढखडएचएछढपहिल्याच षटकापासून ट्रॅव्हिस हेडने स्फोटक खेळी करायला सुरूवात केली. आजसनरायझर्स हैदराबादआणिमुंबई इंडियन्सयांच्यात सामना होत आहे. हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना खेळवला जात आहे.मुंबई इंडियन्सचाकर्णधारहार्दिक पांड्यानेनाणेफेकजिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दोन्हीही संघांनी प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल केला.यजमान संघात ट्रॅव्हिस हेड आणि जयदेव उनाडकट यांची एन्ट्री झाली आहे. तर मुंबईच्या संघात ल्यूक वुडच्या जागी घुशपर चरहिरज़र ला संधी मिळाली आहे. प्रथम फलंदाजीला आलेल्या यजमानांनी मुंबईची चांगलीच धुलाई केली. ट्रॅव्हिस हेडने अवघ्या १८ चेंडूत ५० धावा करून ऐतिहासिक खेळी केली. हैदराबादकडून सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा तो खेळाडू ठरला पण त्याचा हा विक्रम काही मिनिटांतच अभिषेक शर्माने तोडला. हैदराबादने पहिल्या ७ षटकांतच १०० धावांचा आकडा गाठला.अभिषेक शर्माने अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक झळकावण्याची किमया साधली.अभिषेक शर्माने ७ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने २३ चेंडूत ६३ धावांची स्फोटक खेळी केली.आयपीएलच्या इतिहासात पहिल्या १० षटकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम देखील या सामन्यात झाला. सनरायझर्स हैदराबादने १० षटकांच २ बाद १४८ धावा करूनमुंबई इंडियन्सच्यागोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला.आजच्या सामन्यासाठी हैदराबादचा संघ -

पॅट कमिन्स (कर्णधार), मयंक अग्रवाल, राहुल त्रिपाठी, एडन मार्करम, हेनरिक क्लासेन (यष्टीरक्षक), अब्दुल समद, शाहबाज अहमद, ट्रॅव्हिस हेड, भुवनेश्वर कुमार, मयंक मार्कंडेय आणि जयदेव उनाडकट.

आपलं मनोरंजन

'रामायण'मध्ये कौशल्याच्या भूमिकेसाठी 'निमल'मधील अभिनेत्रीची निवड?

नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' या चित्रपटाविषयी मोठी अपडेट समोर आली आहे. या चित्रपटात श्रीराम यांची आई कौशल्या यांची भूमिका कोण साकारणार, या प्रश्नाचं उत्तर मिळालं आहे. 'रामायण' हा बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित चित्रपट पुढच्या वर्षी दिवाळीच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाविषयीची अधिकृत माहिती एप्रिल महिन्यात जाहीर केली जाऊ शकते. अभिनेता रणबीर कपूर यामध्ये प्रभू श्रीराम यांची भूमिका साकारणार असल्याचं कळतंय. तर कौशल्याच्या भूमिकेसाठी अभिनेत्री इंदिरा कृष्णन यांची निवड करण्यात आली आहे. या चित्रपटातील मुख्य भूमिकेसाठी रणबीर सध्या जोरदार तयार करत आहे.श्रीराम यांच्या भूमिकेची तयारी करण्यासाठी रणबीरने मांसाहार आणि मद्यपानदेखील सोडल्याचं कळतंय. नुकताच त्याचा एक फोटो सोशल मीडियावर चर्चेत आला होता. ज्यानंतर तो तिरंदाजी शिकत असल्याच्या चर्चांनाही उधाण आलंय. रामायणावर आधारित या चित्रपटात दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत असेल. तर केजीएफ फेम अभिनेता यशला लंकापती रावणाच्या भूमिकेची ऑफर देण्यात आली आहे. यामध्ये सनी देओल हनुमानाच्या आणि रकुल प्रीत शूर्पणखेच्या भूमिकेत दिसणार आहे. यादरम्यान आता कौशल्येच्या भूमिकेसाठी इंदिरा कृष्णन यांचं नाव समोर येतंय.हे सुद्धा वाचा बोनी कपूर यांचं थक्क करणारं ट्रान्सफॉर्मेशन; श्रीदेवी यांचं कनेक्शन पाहून नेटकऱ्यांनी केले कमेंट्स 'मुरांबा' मालिकेत मोठा ट्विस्ट; 'या' प्रसिद्ध अभिनेत्याची होणार धमाकेदार एण्ट्री कपिल शर्मासोबतच्या वादावर ७ वर्षांनंतर सुनील ग्रोवरने सोडलं मौन; म्हणाला विमानात बसल्यावर समजलं.. ऐश्वर्या रायने बच्चन कुटुंबीयांसोबत रंगपंचमी साजरी केलीच नव्हती? फोटोंवरून नेटकऱ्यांचा सवालया चित्रपटात लारा दत्ता कैकेईची भूमिका साकारणार आहे. फक्त साई पल्लवीच नाही तर दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील आणखी एक मोठं नाव या चित्रपटाशी जोडलं गेलं आहे. अभिनेता विजय सेतुपती या चित्रपटात विभीषणाची भूमिका साकारणार असल्याचं कळतंय. ओम राऊत दिग्दर्शित 'आदिपुरुष' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरल्यानंतर नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटाबद्दल जोरदार चर्चा सुरू झाली होती. रणबीर आणि त्याची पत्नी आलिया भट्ट हे दोघं राम-सीतेच्या भूमिकेत दिसणार असल्याचं म्हटलं जात होतं. मात्र आता सीतेच्या भूमिकेसाठी साई पल्लवीला निश्चित केल्याचं समजतंय.'ई टाइम्स'ने दिलेल्या वृत्तानुसार, निर्मात्यांनी कौशल्याची भूमिका साकारण्यासाठी अनुभवी अभिनेत्री इंदिरा कृष्णन यांची निवड केली आहे. इंदिरा यांनी रणबीर कपूरच्या 'निमल' चित्रपटातदेखील भूमिका साकारली होती. यामध्ये त्या रणबीरच्या सासू आणि रश्मिका मंदानाच्या आईच्या भूमिकेत होत्या. रणबीरनेच कौशल्याच्या भूमिकेसाठी त्यांचं नाव सुचवल्याचं कळतंय. मात्र याबद्दल अद्याप इंदिरा यांच्याकडून कोणतीच प्रतिक्रिया समोर आली नाही. इंदिरा यांनी सोशल मीडियावर नुकताच रणबीरसोबतचा एक फोटो शेअर केला होता. यामध्ये त्या रणबीरसोबत मिळून एका चित्रपटाच्या रीडिंग सेशनमध्ये सहभागी झाल्या होत्या.

तापसीनंतर अदिती राव हैदरीने गुपचूप उरकलं लग्न; 'रंग दे बसंती' फेम अभिनेत्याशी विवाहबद्ध

अभिनेत्री अदिती राव हैदरीने बॉयफ्रेंड सिद्धार्थशी तेलंगणामधील एका मंदिरात गुपचूप लग्न केल्याचं कळतंय. गेल्या काही वर्षांपासून हे दोघं एकमेकांना डेट करत होते. विविध कार्यक्रमांमध्येही सिद्धार्थ-अदितीला एकत्र पाहिलं गेलंय.

अभिनेत्री अदिती राव हैदरीने बॉयफ्रेंड सिद्धार्थशी तेलंगणामधील एका मंदिरात गुपचूप लग्न केल्याचं कळतंय. गेल्या काही वर्षांपासून हे दोघं एकमेकांना डेट करत होते. विविध कार्यक्रमांमध्येही सिद्धार्थ-अदितीला एकत्र पाहिलं गेलंय.

सिद्धार्थ आणि अदिती हे सोशल मीडियावर एकमेकांसोबतचे फोटो, व्हिडीओ पोस्ट करायचे. मात्र दोघांनी कधीच नात्याविषयी प्रतिक्रिया दिली नाही. बुधवारी (२७ मार्च) या दोघांनी तेलंगणामधील एका मंदिरात लग्न केल्याची माहिती समोर येत आहे. सिद्धार्थ आणि अदिती हे सोशल मीडियावर एकमेकांसोबतचे फोटो, व्हिडीओ पोस्ट करायचे. मात्र दोघांनी कधीच नात्याविषयी प्रतिक्रिया दिली नाही. बुधवारी (२७ मार्च) या दोघांनी तेलंगणामधील एका मंदिरात लग्न केल्याची माहिती समोर येत आहे.

तेलंगणामधील वनपार्थी जिल्ह्यातील श्रीरंगपुरमइथल्या रंगनायकस्वामी मंदिरात या दोघांनी लग्न केलं. हे दोघं लवकरच त्यांच्या लग्नाची अधिकृत घोषणा करणार आहेत.

लागोपाठ १६ फ्लॉप चित्रपटांबद्दल अखेर अक्षय कुमारने सोडलं मौन; म्हणाला..

बॉलिवूडचा 'खिलाडी' अर्थात अभिनेता अक्षय कुमारने अनेक हिट चित्रपट दिले आहेत. मात्र त्याच्या करिअरमध्ये असाही काळ होता, जेव्हा त्याचे चित्रपट लागोपाठ फ्लॉप झाले. आता तो 'बडे मियाँ छोटे मियाँ' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त दिलेल्या एका मुलाखतीत अक्षय त्याच्या फ्लॉप चित्रपटांबद्दल व्यक्त झाला. 'सेल्फी', 'मिशन रानीगंज' यांसारखे त्याचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर दणक्यात आपटले होते. याविषयी अक्षय म्हणाला की चित्रपटाला यशस्वी करण्यासाठी तो बरीच मेहनत घेतो, मात्र बॉक्स ऑफिसवर त्याचं काय नशीब असेल हे त्याच्या हातात नाही.

'बडे मियाँ छोटे मियाँ' या चित्रपटाच्या ट्रेलर लाँच कार्यक्रमात अक्षय म्हणाला, आम्ही प्रत्येक प्रकारच्या चित्रपटासाठी प्रयत्न करत असतो. मी एकाच चौकटीत अडकून बसत नाही. एका जॉनरवरून दुसऱ्या जॉनरवर मी सतत उड्या मारतच असतो. मग त्यात यश मिळो किंवा न मिळो. मी नेहमीच अशाच पद्धतीने काम केलंय. यापुढेही तसंच करत राहीन. काही सामाजिक, काही चांगल्या कथेचे, काही कॉमेडी आणि काही क्शन..

मी नेहमी विविध प्रकारचे चित्रपट करत राहीन. लोक म्हणतात म्हणून मी एकाच प्रकारच्या कामात अडकून पडणार नाही. सर आजकाल कॉमेडी आणि क्शन खूप चालतंय, असं लोक म्हणतात. पण याचा अर्थ असा नाही की मी फक्त क्शनच करेन. एकाच प्रकारचे चित्रपट करून मी स्वत: कंटाळून जाईन. टॉयलेट: एक प्रेम कथा असो, एअरलिफ्ट असो किंवा रुस्तम.. जेवढे चित्रपट मी केले आहेत, त्यापैकी काहींना यश मिळालं तर काहींना नाही, असं तो पुढे म्हणाला.

गोष्ट काळजीची हिल्स वापरण्याची

मुलींसाठी फॅशनमध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट काय असेल? तर याचे उत्तर हिल्स, सँडल्स हे प्राधान्यानं असेल. कोणताही लूक किंवा पेहराव हा हिल्सशिवाय अपूर्णच असतो, कारण हिल्समुळे बॉडी पॉश्चर मिळते आणि चालण्यात एकप्रकारची ग्रेस मिळते. मात्र काही वेळा या हिल्स खूप त्रासदायक ठरतात. पण तुम्हाला हिल्स आवडत असेल तर खाली दिलेल्या टिप्स फॉलो करा आणि बिनधास्त हिल्स वापरा.

बकल्स किंवा स्ट्रॅप्स हिल्स : बकल्स किंवा स्ट्रॅप्स असलेल्या सँडलला महत्व द्या. कारण ते तुमच्या पायांना आधार आणि आराम देतात. तसेच या हिल्समुळे पाय सुरक्षीत राहतो. पायाला फोड येण्याची शक्यताही कमी होते.

ब्लॉक हिल्स : ब्लॉक हिल्स खरेदी करा. कारण त्यामुळे तुमच्या पायाला दुखापत होणार नाही आणि त्या जाड असतात त्यामुळे पायाला आराम मिळेल.

घरामध्ये वापरून पाहा

नविन हिल्स जास्त टाइट असतात त्यामुळे तुम्हाला इचिंग किंवा शू बाइट होऊ शकतं त्यासाठी हिल्स बाहेर वापरण्याआधी घरामध्ये सॉक्स घालून त्यावरून हिल्स घाला आणि चालून पाहा. असं केल्याने हिल्स सैल होतील आणि तुमच्या पायाला त्याची सवय होऊन व्यवस्थित बसतील.

टॅलकम पावडर : हिल्स घालून चालताना पाय सरळ ठेवून पुढं टाका आणि शक्यतो दगड खड्डे असलेल्या रस्त्यावरून चालायचं टाळा. हिल्स घालण्याआधी जर पायाला टॅलकम पावडर लावल्याने फोड येणार नाही.

फिजिओथेरपी इतिहास आणि महत्त्व

इतिहास

जागतिक फिजिओथेरपी या दिवसाची स्थापना १९५१ मध्ये करण्यात आली. त्यानंतर हा दिवस ८ सप्टेंबर १९९६ मध्ये पहिल्यांदा साजरा करण्यात आला. तसेच हा दिवस जागतिक भौतिक चिकित्सा समुदायाची एकता दर्शवितो. या दिवशी फिजिओथेरपिस्टच्या कार्याबाबत जागरूकता वाढवण्याचा आणि आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. या दिवशी या क्षेत्रातील लोकांना आणि त्यांच्या कामाला प्रोत्साहन देणे आणि त्यांचे कौशल्य वाढवणे यावर अधिक भर देण्यात आला.

फिजिओथेरपीचे काही फायदे

फिजिओथेरपी ही लोकांना दुखापतीतून बरे होण्यास, वेदना कमी करण्यास, भविष्यात होणारी दुखापत रोखण्यास किंवा एखाद्या दीर्घ शारीरिक समस्येशी किंवा अवस्थेस सामोरे जाण्यास मदत करते. जर तुम्हाला दुखापत झाली असेल किंवा तीव्र वेदना होत असेल तर शारीरिक उपचार वेदनांशी संबंधित मूलभूत समस्या सोडविण्यास फिजिओथेरपीची निवड करतात. हे केवळ वेदनामुक्ती देऊ शकत नाही, तर सतत सुरू असलेल्या समस्या टाळण्यासाठी दुरुस्त करण्यात मदत देखील करू शकते.

हे तुम्हाला दुखापत टाळण्यास मदत करू शकते.

वेदना कमी करण्यास मदत करते.

स्ट्रोकमधून बरे होण्यास देखील मदत करू शकते.

वयाशी संबंधित वैद्यकीय समस्या चांगल्या प्रकारे नियंत्रणात आणण्यासमदत होते.

या वेळेनंतर कधीच खावू नये फळे,आयुर्वेदात सांगितलंय मुख्य कारण

आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी पोषण अत्यंत महत्वाचे आहे. फळे जीवनसत्त्वे आणि खनिजांसाठी सर्वोत्तम स्रोत मानली जातात. पण कोणती फळे संध्याकाळी ४ नंतर टाळले पाहिजेत. या वेळेनंतर फळे खाणे शरीराला हानी पोहोचवू शकते.

तज्ञांच्या मते, ज्याप्रमाणे निरोगी होण्यासाठी खाण्याची एक आदर्श वेळ आहे, त्याचप्रमाणे फळे खाण्याची एक निश्चित वेळ असावी जेणेकरून आपल्याला त्यातून जास्तीत जास्त पोषण मिळू शकेल.

जर तुमचा आयुर्वेदावर विश्वास असेल तर असे सांगितले गेले आहे की, सूर्यास्तापूर्वी आपण फळांचे सेवन केले पाहिजे. सूर्यास्ताची वेळ संध्याकाळी ४ वाजता सुरू होते. याबद्दल लाइफस्टाइल आणि वेलनेस कोच ल्यूक कॉन्टिन्हो यांनी अलीकडेच इन्स्टाग्रामवर आपल्या फॉलोअर्सला सांगितले की, सूर्यास्तापूर्वी फळे का खावीत.

आपल्या पोस्टमध्ये, ल्यूकने लिहिले की, 'आयुर्वेदानुसार,' भारताच्या प्राचीन वैद्यकीय पद्धतीत संध्याकाळी फळे खाल्ल्याने झोपेच्या वेळापत्रकावर परिणाम होऊ शकतो आणि पाचन तंत्रातही व्यत्यय येऊ शकतो. ' पुरेशी झोप न मिळणे ही आधीच लोकांच्या चिंतेची बाब बनली आहे.

जसे आपल्याला माहित आहे की बहुतेक फळे साधे कार्बोहायड्रेट असतात ज्यामुळे ते शरीरात त्वरीत पचतात. अशी फळे झटपट ऊर्जेचा एक चांगला स्रोत आहेत, परंतु हे लक्षात ठेवा की ते आपल्या रक्तातील साखरेला खूप वेगाने वाढवतात.

हेच कारण आहे की झोपेच्या आधी थोडेसे या फळांचे सेवन केल्याने रक्तातील साखर वाढून झोप खराब होऊ शकते. दुसरे म्हणजे, सूर्यास्तानंतर आपली पाचन प्रणाली थोडी सुस्त होते आणि म्हणूनच लोकांना फळांमध्ये असलेले कार्बोहाइड्रेट्स पचवणे कठीण होते. म्हणून, संध्याकाळी कमी कार्बोहायड्रेट खाले पाहिजे.

फळे खाण्याची योग्य वेळ

लूकच्या मते, सकाळी रिकाम्या पोटी फळांचे सेवन करणे आपल्या आरोग्यासाठी चांगले असते. सुमारे १० तास काहीही न खाता झोपेतून उठल्यानंतर आपले पोट रिकामे असते. यावेळी फळे खाल्ल्याने शरीराला पुरेसे पोषक मिळतील आणि चयापचय प्रणाली देखील योग्य होईल.

तज्ञांनी असेही सांगितले की फळे एकतर अन्नाबरोबर खावीत किंवा जेवणानंतर लगेच खावीत. जेवणाच्या वर फळे खाल्ल्यानंतर, तुम्ही सुमारे साडेतीन तास काहीही खाणे टाळावे. सकाळ व्यतिरिक्त, आपण व्यायाम करण्यापूर्वी किंवा नंतर कार्ब्स घेऊ शकता. सूर्यास्तानंतर, चरबी, प्रथिने आणि कमी कार्ब्स खाणे चांगले.

आपण एकाच वेळी कोणतेही एक फळ खावे आणि या फळांना दुग्धजन्य पदार्थ किंवा हिरव्या भाज्यांसह एकत्र करू नये. दुग्धजन्य पदार्थ किंवा हिरव्या भाज्यांसह फळांचे सेवन केल्याने शरीरात विष निर्माण होते. या विषांमुळे आपण अनेक प्रकारच्या आजारांना बळी पडू

भाजपाने तिकीट नाकारल्यानंतर वरुण गांधींचा मोठा निर्णय

नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाने तिकीट नाकारल्यानंतर वरुण गांधी आता काय निर्णय घेणार याकडे सर्वांचं लक्ष होतं. याचं कारण भाजपाने तिकीट नाकारल्याने काँग्रेसने त्यांना आपल्या पक्षात येण्याची खुली ऑफर दिली होती. त्यामुळे वरुण गांधी काँग्रेसशी हातमिळवणी करणार का? याची सर्वांना उत्सुकता होती. पण वरुण गांधी यांनी सर्वांना आश्चर्याचा धक्का देत लोकसभा निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला आहे. वरुण गांधींच्या टीमने यासंदर्भात माहिती दिली आहे. वरुण गांधी आपली आई मनेका गांधी यांच्या प्रचारावर संपूर्ण लक्ष केंद्रीत करणार आहेत. मनेका गांधी सुल्तानपूरमधून निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

भाजपाने वरुण गांधी यांना यावेळी पिलीभूतमधून लोकसभेची उमेदवारी देण्यास नकार दिला. त्यांच्या जागी जितीन प्रसाद यांना भाजपाने संधी दिली आहे. दरम्यान मनेका गांधी यांना मात्र सुल्तानपूर येथून तिकीट देण्यात आलं आहे. यानंतर वरुण गांधी पिलीभूत येथून अपक्ष निवडणूक लढतील अशी शक्यता व्यक्त केली होती. पण त्यांच्या टीमने या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

वरुण गांधी यांना तिकीट नाकारण्यात आल्यानंतर उत्तर प्रदेशचे भाजपा प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र सिंग यांनी, पक्षाने त्यांना निवडणूक लढण्याची संधी दिलेली नसली तरी ते आमच्यासोबत आहेत असा विश्वास व्यक्त केला होता. पक्ष नेतृत्वाने त्यांच्यासाठी काहीतरी चांगला विचार केला असेल असंही ते म्हणाले होते. काँग्रेसने त्यांना ऑफर दिल्यासंबंधी ते म्हणाले होते की, ''वरुण गांधी भाजपाचे खरे शिपाई आहेत. ते भाजपातच राहतील याचा विश्वास आहे. ते गांधी कुटुंबातील असून, भाजपानेच तीन वेळा खासदार बनवलं आहे''. काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी गांधी कुटुंबातील असल्याने भाजपाने त्यांना तिकीट दिलं नसल्याचा आरोप केला होता.

काँग्रेसने दिली होती ऑफर

अधीर रंजन चौधरी म्हणाले होते की, ''वरुण गांधींनी काँग्रेसमध्ये सहभागी झालं पाहिजे. ते काँग्रेसमध्ये आल्यास आम्हाला आनंद होईल. वरुण एक चांगले नेते आहेत. ते गांधी कुटुंबाशी संबंधित असल्याने भाजपाने त्यांना तिकीट दिलं नाही. त्यांनी आता काँग्रेसमध्ये यावं अशी आमची इच्छा आहे''.

गेल्या काही वर्षांपासून वरुण गांधी सतत सरकारविरोधात विधानं करत आहेत. केंद्र तसंच राज्य सरकारवरही त्यांनी ताशेरे ओढले होते. पक्षाविरोधात भूमिका घेत असल्यानेच भाजपाने त्यांना कोणतीही मोठी जबाबदारी दिली नाही असं बोललं जातं.

भाजपाच्या सहा याद्या जाहीर; ४०५ उमेदवारांची घोषणा

नवी दिल्ली : भाजपाने लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या सहा याद्या जाहीर केल्या आहेत. या याद्यांमधून भाजपाने ४०५ उमेदवारांची घोषणा केली. यात महाराष्ट्रातील २३ उमेदवारांचा समावेश आहे. भाजपाने २०१९ मध्ये लोकसभेच्या महाराष्ट्रातील ४८ पैकी २५ जागा लढवल्या आणि २३ जिंकल्या होत्या. यंदा भाजपाने राज्यातील २३ उमेदवारांची घोषणा केली आहे. राज्यातल्या आणखी काही जागांवरील भाजपाच्या उमेदवारांची घोषणा गुरुवार २८ मार्च २०२४ रोजी होणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

भाजपाची पहिली यादी १९५ उमेदवार
भाजपाची दुसरी यादी ७२ उमेदवार
भाजपाची तिसरी यादी ९ उमेदवार
भाजपाची चौथी यादी १५ उमेदवार
भाजपाची पाचवी यादी १११ उमेदवार
भाजपाची सहावी यादी ३ उमेदवार

भाजपाने पाचव्या यादीतून महाराष्ट्रातील तीन उमेदवारांची घोषणा केली. भाजपाने दुसऱ्या यादीतून महाराष्ट्रातील वीस उमेदवारांची घोषणा केली.

भाजपाची सहावी यादी – तीन उमेदवारांची घोषणा

राजस्थान
करौली – धौलपूर – इंदूदेवी जाटव
दौसा – कन्हैयालाल मीणा
मणिपूर
इनर मणिपूर – थौनाओजम बसंतकुमार सिंह

भाजपाचे महाराष्ट्रातील उमेदवार
भंडारा – गोंदिया – सुनिल मेंढे
गडचिरोली – चिमूर – अशोक नेते
सोलापूर – राम सातपुते
नंदुरबार – हिना गावित
धुळे – सुभाष भामरे
जळगाव – स्मिता वाघ
रावेर – रक्षा खडसे
अकोला – अनुप धोत्रे
वर्धा – रामदास तडस
नागपूर – नितीन गडकरी
चंद्रपूर – सुधीर मुनगंटीवार
नांदेड – प्रतापराव पाटील चिखलीकर
जालना – रावसाहेब दानवे पाटील
दिंडोरी – भारती पवार
भिवंडी – कपिल पाटील
उत्तर मुंबई – पियुष गोयल
ईशान्य मुंबई – मिहीर कोटेचा
पुणे – मुरलीधर मोहोळ
अहमदनगर – सुजय विखे पाटील
बीड – पंकजा मुंडे
लातूर – सुधाकर श्रृंगारे
माढा – रणजीतसिंह नाईक निंबाळकर
सांगली – संजय पाटील

गोव्यातील AAP च्या प्रदेशाध्यक्षांसह चार नेत्यांना ED चे समन्स

दिल्ली मद्य घोटाळ्यातील कथित मनी लॉंड्रिंगप्रकरणी मुख्यमंत्रीअरविंद केजरीवालयांच्या अटकेनंतर, आता एऊ नेआपलीकारवाई सुरुच ठेवली आहे. याच प्रकरणात आता आम आदमी पक्षाचे गोव्याचे प्रदेशाध्यक्ष अमित पालेकर आणि पक्षाच्या इतर दोन नेत्यांना चौकशीसाठी बोलावले आहे.

त्यांच्या सोबतच भंडारी समाजातील अशोक नाईक यांनाही एजन्सीने समन्स पाठवले आहे. अंमलबजावणी संचालनालयाने २८ मार्च रोजी या सर्वांना चौकशीसाठी दिल्ली कार्यालयात बोलावले आहे.

मतदानाच्या दिवशी सरसकट भरपगारी रजा

नवी दिल्ली : काही दिवसांपूर्वीच केंद्रीय निवडणूक आयोगाने देशातील आगामी लोकसभा निवडणुकांसंदर्भातील तारखा जाहीर केल्या. यावेळी देशातील लोकसभा निवडणूक पाच टप्प्यांमध्ये होणार असल्याचे स्पष्ट झाले. महाराष्ट्रातही पाच टप्प्यांमध्ये विविध लोकसभा मतदारसंघांत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

देशातील लोकशाहीचा जागर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या निवडणुकीमध्ये अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने यासंदर्भातील परिपत्रक मंगळवारी जारी केले.

राज्यातील विविध मतदार संघांमध्ये मतदानास पात्र असणारे कामगार, अधिकारी आणि कर्मचारी यांना ते कामानिमित्त निवडणूक क्षेत्राबाहेर असले तरीही ही भरपगारी सुट्टी लागू होणार आहे. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी म्हणून ही सुट्टी देण्यात येणार असून, सर्व उद्योग समूह, कंपन्या, संस्था, महामंडळांना लागू असणार आहे.

जिथंजिथं कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसेल तिथंतिथे त्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी कामातून २ तासांची सवलत देण्यात यावी अशा सूचनाही शासनाने केल्या आहेत. अर्थात इथे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या परवानगीही आवश्यक असतील.

महाराष्ट्रात कोणकोणत्या तारखांना आहे मतदान?

निवडणुकीचा टप्पा मतदारसंघ मतदानाची तारीख

पहिला टप्पा रामटेक, नागपूर, भंडारा, गरचिरोली, चंद्रपूर १९ एप्रिल

दुसरा टप्पा बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी २६ एप्रिल

तिसरा टप्पा रायगड, बारामती, उस्मानबाद, लातूर, सोलापर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी, कोल्हापूर, हातकणंगले ७ मे

चौथा टप्पा नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, बीड १३ मे

पाचवा टप्पा धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, (मुंबईतल्या ६ जागा) २० मे

१३५ जणांचा जीव घेणाऱ्या मोरबी पूल दुर्घटनेतील आरोपीला अखेर जामीन

मोरबनी : गुजरातमध्ये २०२२ मध्ये झालेल्या मोरबी पूल दुर्घटनेप्रकरणातील मुख्य आरोपी ओरेवा ग्रुपचे सीएमडी जयसुख पटेल यांना जामीन मिळाला आहे. परंतु, या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होईपर्यंत त्यांना जिल्ह्यात बंदी घालण्यात आली आहे. तसंच, त्यांना इतर सात कडक बंधनेही लादण्यात आली आहेत.

या खटल्यातील मुख्य आरोपी जयसुख पटेल यांची सर्वोच्च न्यायालयाने नियमित जामीन याचिका फेटाळल्यानंतर काही दिवसांनी सत्र न्यायालयाचे न्यायाधीश पी.सी. जोशी यांच्या आदेशानुसार मोरबी उपजेलमधून सुटका करण्यात आली. जामीन देताना ट्रायल कोर्टाने त्याच्यासाठी कठोर अटी व शर्ती ठेवण्याचे निर्देश दिले. गुजरातमधील मोरबी शहरात नदीवर बांधलेला मोरबी सस्पेंशन ब्रिज ३० ऑक्टोबर २०२२ रोजी कोसळला होता. या दुर्घटनेत १३५ लोकांचा मृत्यू झाला होता.

विशेष सरकारी वकील विजय जानी यांनी सांगितले की, मंगळवारी सत्र न्यायाधीश पी सी जोशी यांच्या न्यायालयाने या प्रकरणातील मुख्य आरोपी जयसुख पटेल याला नियमित जामिनावर सोडण्यासाठी सात अटी घातल्या आहेत. आरोपीला खटला संपेपर्यंत मोरबी जिल्ह्याबाहेर राहण्याचे आणि चाचणीच्या तारखांनाच जिल्ह्यात येण्याचे निर्देश देण्यात आले होते.

सात दिवसांच्या आत पासपोर्ट जमा करण्याच्या सूचना

आरोपीला जामीन बॉण्ड म्हणून १ लाख रुपये जमा करण्याचे आणि पुराव्यांशी छेडछाड किंवा साक्षीदारांवर दबाव टाकू नये असे निर्देशही देण्यात आले आहेत. न्यायालयाने पटेल यांना सात दिवसांच्या आत पासपोर्ट जमा करण्याचे निर्देश दिले आणि ट्रायल कोर्टात सुनावणीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले.

केजरीवालांच्या अटकेवर अमेरिकेची प्रतिक्रिया

दिल्ली मद्य धोरणातील कथित घोटाळ्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने मुख्यमंत्रीअरविंद केजरीवालयांना ताब्यात घेतल्यानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने त्यावर भाष्य केले होते. अरविंद केजरीवालयांच्या अटकेवर आम्ही लक्ष ठेवून आहोत, असे अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटले होते. आता अमेरिकेच्या वक्तव्यावर भारताने कडक शब्दात प्रतिक्रिया दिली आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने बुधवारी(दि.२७) अमेरिकेचे भारतातील अधिकारी ग्लोरिया बारबेना यांना बोलावून घेतले. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी आणि बारबेना यांच्यात यांच्यात सुमारे ४० मिनिटे चर्चा झाली.

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी निवेदन जारी करुन याबाबत माहिती दिली. 'भारतातील काही कायदेशीर कार्यवाहींवर अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने केलेल्या टिपणीवर आमचा तीव्र आक्षेप आहे. मुत्सद्देगिरीमध्ये इतर देशांच्या सार्वभौमत्वाचा आणि अंतर्गत बाबींचा आदर केला जातो. प्रकरण सहकारी लोकशाही देशातील असेल, तर जबाबदारी आणखी वाढते. असे न झाल्यास एक वाईट उदाहरण लोकांसमोर जाईल. भारताची कायदेशीर प्रक्रिया स्वतंत्र न्यायव्यवस्थेवर आधारित आहे. भारतीय न्यायव्यवस्थेवर आक्षेप घेणे अन्यायकारक ठरेल,' असे भारतीय परराष्ट्र विभागाकडून सांगण्यात आले.

केजरीवाल यांच्या अटकेवर भाष्य करणाराअमेरिकाहा पहिला देश नाही. यापूर्वी जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयानेही केजरीवाल यांच्या अटकेवर भाष्य केले होते. केजरीवाल यांच्या अटकेवर टिप्पणी करताना जर्मन परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, आम्ही या प्रकरणाची दखल घेतली आहे. भारत हा लोकशाही देश आहे. आम्हाला आशा आहे की, न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याशी संबंधित सर्व मानके आणि मूलभूत लोकशाही तत्त्वे या प्रकरणातदेखील लागू होतील.भारताने तीव्र आक्षेप घेतला होता.

सायबर गुन्हे करण्याकरिता कर्मचाऱ्यांना पगारी ठेवून साडेचार कोटींची फसवणूक

बंगळुरु : बनावट वेबसाईट तयार करुन विमा कंपन्यांच्या नावाखाली कॉल करुन कोट्यवधी रुपयांची ऑनलाइन फसवणूक करणाऱ्याला शहरातील सायबर गुन्हे पोलिसांनी अटक केलीय. मनवीर सिंग असं अटक केलेल्या आरोपीचं नाव आहे. तो उत्तर प्रदेशतील गाझियाबादचा रहिवासी आहे. यात फसवणूक झालेल्या मुरलीधर राव यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल करुन आरोपीला अटक केलीय. विमा काढण्याच्या बहाण्यानं आरोपीनं अनेकांची साडेचार कोटींची फसवणूक केल्याचं तपासात समोर आलंय.

विम्याचं आमिष दाखवून उकळले लाखो रुपये : बीएस्सी पदवीधर असलेला मनवीर गेल्या चार वर्षापासून फसवणुकीसाठी गुन्हे करत होता. त्यानं नामांकित बँकांच्या नावाने बनावट वेबसाईट उघडल्या. कमी वेळात जास्त पैसे मिळवण्यासाठी विमा योजना आहे, असे त्यानं जाहिरातीत छापले होते. जनतेला विमा कंपन्यांच्या नावाने फोन करून प्रीमियम बॉण्ड्सचे आमिष दाखवायचा. त्यासाठी पॉलिसी घ्यायला भाग पाडायचा. पोलिसांनी सांगितले की, लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवून लाखो रुपये ऑनलाइन भरले.

विम्याचा प्रीमियम बाँड आल्याचे सांगत गंडवले : उत्तर प्रदेशात फसवणूक करणाऱ्या आरोपीनं रेकॉर्ड गोळा करण्यासाठी एका कन्सल्टन्सीशी संपर्क साधला होता. त्याद्वारे एका कर्मचाऱ्याला काम दिले होते. जमा केलेली कागदपत्रं तो कर्मचाऱ्याला फोनवरुन ग्राहकाचा पत्ता सांगून कुरिअर करत होता. मुरलीधर राव नावाच्या व्यक्तीलाही त्याने अशाच प्रकारे फसवणुकीचा बळी बनवले. आरोपीने एका विमा कंपनीकडून बोलत असल्याचे सांगून मुरलीधर राव यांना फोन केला होता. त्यांच्या नावावर प्रीमियम बाँड आला आहे. तो मिळवण्यासाठी तुम्हाला विमा काढावा लागेल, असे सांगितले. यामुळे मुरलीधरन यांनी फसवणूक करणाऱ्याच्या खात्यात चार लाख रुपयेही भरले. खात्यात पैसे ट्रान्सफर झाल्यानंतर मात्र त्याने बनावट बाँड दिले.

फसवणुकीचे ३४ गुन्हे दाखल : मुरलीधर यांनी त्याला अनेकदा फोन करण्याचा प्रयत्न केला. मात्र फोन बंद होता. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच मुरलीधर यांनी याबाबत तक्रार केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीला अटक केल्याचं सांगितलेय. आरोपींविरुद्ध शहरातील विविध पोलीस ठाण्यात फसवणुकीचे ३४ गुन्हे दाखल असल्याचेही तपासात समोर आलेय. आतापर्यंत विविध ग्राहकांची सुमारे साडेचार कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे शहर पोलीस आयुक्त बी दयानंद यांनी सांगितले.

अमेरिकन सरकारने भारतीय क्रू मेंबरांचे केले कौतुक

मेरीलँडमधील पॅटापस्कॉट नदीवरील फ्रान्सिस की ब्रिज अपघातामुळे अनेक वाहने पुलावर पडली. मंगळवारी पहाटे दीडच्या सुमारास ही घटना घडली. घडलेल्या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर दोघांनाही एकमेकांना वाचवण्याची ख्याती मिळाली. बेपत्ता लोकांवर संशोधन सुरू केले. किंवा मेरीलँडचे गव्हर्नर वेस मूर यांनी अपघातानंतर आणीबाणी घोषित केली. हे मालवाहू जहाज सिंगापूर येथील होते, या जहाजेवर असणारे सर्व क्रू मेंबर्स भारतीय होते, या क्रु मेंबरांचे अमेरिकन सरकारने कौतुक केलं आहे.-ऊताएठढखडएचएछढसैनिकांचा 'अपमान', नोबेल विजेतेही अटकेत!या जहाजावर काम करणारे सर्व क्रु मेंबर्स भारतीय आहेत. या क्रू मेंबर्सचे आता अमेरिकेत कौतुक होते आहे. जहाजावर काम करणाऱ्या भारतीय क्रू मेंबर्सनी वेळेवर आम्हाला अलर्ट दिला नसता तर आज मोठी दुर्घटना झाली असती असं अमेरिकन सरकारने म्हटले आहे.सिंगापूर मालवाहू जहाजाच्या भारतीय क्रू मेंबर्सच्या कामाचे कौतुक करताना मेरीलँडचे गव्हर्नर वेस मूर म्हणाले, 'बाल्टीमोरमधील पुलावर जहाज धडक देण्यापूर्वीच भारतीय क्रू मेंबरांनी लगेच इशारा दिला होता. त्यामुळे आम्ही तातडीने पावले उचलली आणि अनेकांचा जीव वाचवण्यात यश मिळालं.' सिंगापूरचं मालवाहू जहाज बाल्टिमोरमध्ये पुलाच्या पिलरला धडकण्यापूर्वीच पायलट आणि इतर क्रू मेंबर च्या मालवाहू जहाजाने इशारा दिला होता. त्यामुळे पुलावरील वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात आली होती.या जहाजावरती सिंगापूरचा ध्वज होता, या जहाजाने बाल्टिमोरमधील धडक दिली. या अपघाताचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. जहाजामधील क्रू मेंबरस्ना कोणतीही इजा झालेली नाही. ते सर्व सुरक्षित आहेत.

नेपाळच्या महापौरांची मुलगी गोव्यातून बेपत्ता

नवी दिल्ली : नेपाळमधील एक तरुणी गोव्यात बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली होती. ही तरुणी नेपाळच्या धनगढी उप-महानगर शहराचे महापौर गोपाल हमाल यांची मुलगी आहे. आरती गेल्या अनेक महिन्यांपासून गोव्यात असून, ओशो मेडिटेशन सेंटरसह काम करत होती. पण गेल्या काही दिवसांपासून ती बेपत्ता झाली होती. सोमवारी रात्री ९.३० वाजता अश्वेम ब्रीजजवळ तिला अखेरचे पाहण्यात आले होते. पण अखेर पोलिसांना तिचा शोध लावण्यात यश आले आहे. गोवा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरती हमाल उत्तर गोव्यातील एका हॉटेलमध्ये सापडल्याची माहिती दिली आहे.

ओशोंच्या मेडिटेशन सेंटरमध्ये सहभागी होण्यासाठी पोहोचलेल्या आरती हमालशी कोणताही संपर्क होत नव्हता. यानंतर तिच्या वडिलांनी काठमांडूतील भारतीत दुतावासाच्या मदतीने गोवा पोलिसांशी संपर्क साधला होता. गोवा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करत सर्च ऑपरेशन सुरु केले होते. तसंच गोपाल हमाल यांनी फेसबुकवर पोस्ट लिहित आपल्या मुलीला शोधून काढण्याचे आवाहन केले होते. त्यांनी गोवा सरकार आणि पोलिसांकडे मुलीला शोधण्यासाठी विनंती केली होती.

गोपाल हमाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरतीच्या मैत्रिणीने आपला तिच्याशी संपर्क होत नसल्याचा मेसेज पाठवला होता. जेव्हा कुटुंबाने तिच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनाही यश आलं नाही आणि पोलिसांना अलर्ट करण्यात आलं.

''माझी मोठी मुलगी आरती ही ओशो मेडिटेटर असून गेल्या काही महिन्यांपासून गोव्यात राहत आहे. ला तिच्या मैत्रिणीकडून एक मेसेज आला की काल तिचा जोरबा बीच, अश्वेमजवळ आरतीशी संपर्क तुटला. मी गोव्यात राहणाऱ्यांना विनंती करतो की माझ्या मुलीच्या, आरतीच्या शोधात मदत करावी,'' असं आवाहन त्यांनी केलं होतं. आपली छोटी मुलगी आणि जावई तिच्या शोधात गोव्यात पोहोचल्याची माहितीही त्यांनी दिली होती.

''काही लोकांची खूप मदत झाली आहे आणि आम्ही त्यांचे सदैव ऋणी आहोत. काही कॉलर्सच्या म्हणण्यानुसार ती शेवटची सिओलिम जवळील एका पुलावर पाहिली गेली होती. त्यांच्यापैकी काही जणांचं म्हणणं आहे की, बेशुद्ध झाल्याने तिला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आलं होते. तर इतर सांगत आहेत की तिला पोलीस ठाण्यात नेण्यात आले,'' अशी माहिती आरतीची बहिण आरजूने फेसबुक पोस्टमध्ये म्हटलं होतं.

दरम्यान दुतावासाने मध्यस्थी केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करत तिचा शोध सुरु केला होता. पोलिसांनी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी अखेर आरती हमालला शोधून काढले आहे.

सैनिकांचा 'अपमान', नोबेल विजेतेही अटकेत

चीन आणि रशिया हे दोन देश असे आहेत, जिथे सगळ्याच गोष्टी पोलादी साखळदंडांनी बांधून ठेवलेल्या आहेत. सरकारच्या किंवा राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीशिवाय एकही गोष्ट तिथून बाहेर जाऊ शकत नाही. त्यामुळे या दोन्ही देशांत नक्की काय चालले आहे, जी माहिती ते देताहेत ती खरी की खोटी यावर काहीच विश्वास ठेवता येत नाही. त्याचवेळी आपल्याविरुद्ध बोलणाऱ्या किंवा वागणाऱ्या व्यक्तीचं म्हणणं कितीही बरोबर असो, त्याला 'शिक्षा' देणं हीच त्यांची इतिकर्तव्यता असते. चीनमध्ये सरकारविरुद्ध बोलणारे अनेक जण आजवर गायब झालेले आहेत. ते अजूनही सापडलेले नाहीत. त्यात अगदी मोठमोठ्या लोकांचा आणि मंत्र्यांचाही समावेश आहे. त्यांचं काय झालं, हे सरकारही सांगत नाही.-ऊताएठढखडएचएछढजो प्रकार चीनमध्ये, तोच प्रकार रशियामध्येसुद्धा. सध्या रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू आहे. या काळात तर रशियन सरकारची हडेलहप्पी आणखीच वाढली आहे. आपल्याविरुद्ध बोलणाऱ्यांना पकडायचं आणि त्यांना तुरुंगात टाकायचं, हाच एक एककलमी कार्यक्रम तिथे सुरू आहे. त्याचाच नवा अध्याय सध्या रशियात पाहायला मिळाला. रशियातील ज्या संस्थेला नोबेल पारितोषिक मिळालं आहे, त्या संस्थेच्या प्रमुखालाच सध्या रशियन सरकारनं बेड्या ठोकल्या आहेत आणि त्यांची रवानगी तुरुंगात

केली आहे. काय कारण आहे त्यामागे? एवढ्या मोठ्या जगन्मान्य व्यक्तीला तुरुंगात खडी फोडायला का पाठवलं? - त्याचं कारण अगदी साधं आणि सोपं आहे. कारण त्यांनी राष्ट्राध्यक्ष पुतीन आणि आपल्याच सरकारविरुद्ध आवाज उठवला. त्यांचे वाभाडे काढले. म्हणून त्यांना ही शिक्षा!ओलेग ओर्लेव हे रशियातील एक सामाजिक आणि चळवळीतील कार्यकर्ते. जगभरात त्यांचं नाव आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यात सध्या सुरू असलेल्या युद्धावर त्यांनी आपल्याच सरकारवर कोरडे ओढले. युक्रेनबरोबर रशियानं सुरू केलेलं युद्ध ही रशियन सरकारची अरेरावी आहे आणि रशियानं ताबडतोब हे युद्ध थांबवायला हवं, अशी जाहीर भूमिका त्यांनी घेतली होती.सरकारला याचाच राग आला आणि त्यांनी ओलेग यांना हातकड्या घातल्या. अडीच वर्षांसाठी त्यांची रवानगी तुरुंगात केली. ओलेग यांची भूमिका म्हणजे केवळ रशियन सरकारचाच अपमान नाही, तर युक्रेनसोबतच्या युद्धात जे रशियन नागरिक प्राणपणानं लढताहेत, ज्यांनी त्यासाठी रक्त सांडलं आहे, त्या सैनिकांचाही हा अपमान आहे, असं म्हणून रशियन सरकारनं त्यांना दोषी ठरवलं आहे. ओलेग हे 'मेमोरियल' या संघटनेचे अध्यक्ष आहेत. या संघटनेला २०२२चा नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला होता. हाच नोबेल पुरस्कार युक्रेनच्या ऑर्गनायझेशन सेंटर फॉर सिव्हील लिबर्टीज या संस्थेलाही संयुक्तपणे देण्यात आला होता. ओलेग यांनी एक लेख लिहिला होता. त्याचा मथळा होता, 'त्यांना फॅसिझम हवा आहे आणि तो त्यांना मिळतो आहे!' - या लेखावरूनही सरकारच्या नाकाला खूप मिरच्या झोंबल्या. त्यामुळे त्यांच्यावर खटला भरण्यात आला होता. न्यायालयानं त्यांना अडीच वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर आणि पोलिसांनी जाहीरपणे हातकड्या घातल्यानंतर त्यांनी म्हटलं होतं, याचा अर्थ माझा लेख खरोखरच अचूक, बरोबर आणि सत्य होता! खरं बोलण्याचं फळ मला मिळालं आहे!ओलेग यांना अटक झाल्यानंतर अख्ख्या जगानं रशियावर टीका केली. सोशल मीडियावर तर टीकेचा महापूर उलटला. खटला सुरू असताना न्यायालयात तब्बल १८ पाश्चिमात्य देशांचे मुत्सद्दी उपस्थित होते. सगळ्यांनी या निर्णयावर टीका केली. अमेरिकेनंही ओलेग यांना अटक केल्याबद्दल रशियन सरकारच्या फॅसिस्टवादी धोरणाचा निषेध केला. सरकारवर टीका केल्यामुळे त्यांना अटक केल्याची ही पहिलीच घटना नाही. रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर त्यावेळी रशियामध्ये असलेल्या ३३ वर्षीय केन्सिया करेलिना या अमेरिकन महिलेनं ५१ डॉलर (सुमारे चार हजार रुपये) युक्रेनला दान दिल्याबद्दल तिला अटक करण्यात आली होती. रशियाविरुद्ध युद्ध करण्यासाठी युक्रेनला मदत केल्यानं तिच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला होता.

ज्यांनी ज्यांनी सरकारविरुद्ध ब्र काढला, त्या साऱ्यांचंच अटकसत्र सरकारनं सुरू केल्यानं अनेकांनी गुपचूप देशच सोडला आणि ते परदेशात गेले. सरकारची दडपशाही इतकी की, त्यांनी लहान मुलांनाही सोडलं नाही. काही दिवसांपूर्वी सात ते अकरा वर्षे वयोगटातील काही मुलं आपल्या मातांसह मॉस्को येथील युक्रेनच्या दुतावासासमोर पोहोचले आणि या चिमुकल्यांनी तिथे 'नो टू वॉर' असं लिहिलेले फलक फक्त फडकवले, तरीही त्यांना अटक करण्यात आली.